महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६

विद्युत अधिनियम, २००३

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/पामुप्र/विनियम/--------/ - विद्युत अधिनियम, २००३ (२००३चा ३६) च्या कलम १८१ च्या उप-कलम (१) आणि उप-कलम (२) सह कलम २ च्या उप-कलम (४७), कलम ३०, कलम ३२ च्या उप-कलम (३), कलम ३९ च्या उप-कलम (२)च्या खंड (डी) आणि कलम ४० च्या खंड (सी) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, महाराष्ट्रातील राज्यातंर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेशासाठी, याद्वारे खालील विनियम करीत आहे.

भाग ए : प्रारंभिक

१. संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि प्रारंभ

१.१. या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६", असे म्हणावे.

१.२. हे विनियम महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश आणि वापरासाठी लागू राहतील.

१.३. हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. व्याख्या

२.१ संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसल्यास, या विनियमांमध्ये :-

(१) **"अधिनियम"** म्हणजे वेळोवेळी सुधारित केलेला विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(२) **"वाटप केलेली क्षमता"** म्हणजे दीर्घ-कालिन किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक किंवा निर्मिती केंद्र किंवा वितरण परवानाधारकाला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेवर ठरवून दिलेल्या ठिकाणांमध्ये विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) करण्यासाठी आणि वीज खेचण्यासाठी (ड्रॉअल) विजेचे हस्तांतरण करण्याकरीता परवानगी देण्यात आलेली मेगावॅटमधील (मेवॅ) क्षमता;

(३) **“संतुलन आणि हिशोबपूर्ती संहिता”** “(Balancing and Settlement Code)” म्हणजे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने विकसित केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता ज्यानुसार महाराष्ट्र राज्यातील ग्रिडचा वापर करणाऱ्यांना द्यावयाची निर्धारित ऊर्जा व प्रत्यक्ष दिलेली ऊर्जा यासंबंधीच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये (आवश्यक देवाण-घेवाण करुन) संतुलन राखण्यात येईल व यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यात येईल;

(४) **“द्विपक्षीय व्यवहार”** म्हणजे असा व्यवहार ज्यामध्ये, विनिर्दिष्टीत खरेदीदार आणि विनिर्दिष्टीत विक्रेता यांच्यात, थेट किंवा वीज व्यापार परवानाधारकाच्या किंवा पॉवर एक्स्चेंज मार्फत (ग्रिडमधील) कोणत्याही कालावधीत ऊर्जेचे निश्चित किंवा बदलत्या परिमाणात विनिमय करण्यासाठी केलेला व्यवहार;

(५) **“ठोक वीज पारेषण करार” किंवा “बीपीटीए”** म्हणजे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत प्रवेशासाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला ज्या करारांतील अटी व शर्तीनुसार हक्क प्राप्त झाला आहे असा करण्यात आलेला करार;

(६) **“केंद्रीय आयोग” किंवा “सीईआरसी”** म्हणजे केंद्रीय विद्युत नियामक आयोग;

(७) **“सामुदायिक व्यवहार”** म्हणजे खरेदीदार व विक्रेते यांनी स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून निनावी, एकाच वेळी पॉवर एक्सेंजमध्ये केलेल्या व्यवहारांचा संच;

(८) **"आयोग” किंवा “मविनिआ”** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(९) **“अतिभार”** म्हणजे अशी परिस्थिती ज्यामध्ये पारेषण किंवा वितरण क्षमतेकरिता मागणी ही उपलब्ध हस्तांतरण क्षमतेपेक्षा अधिक असते;

(१०) **“जोडणी करार”** म्हणजे जोडणीयतेला मंजुरी मिळाल्यानंतर पारेषण परवानाधारक आणि स्व-वापरासाठीचा वीज निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्र किंवा ग्राहक किंवा पारेषण परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक, जसे असेल तसे, यांच्यात करावयाचा करार;

(११) **“जोडणीयता”** स्व-वापरासाठीचा वीज निर्मिती प्रकल्पासह निर्मिती केंद्र, ग्राहक किंवा परवानाधारक यांच्या संबंधात “जोडणीयता” म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडून घेण्याची स्थिती;

(१२) **"ग्राहक”** याचा अर्थ अधिनियमामध्ये असल्याप्रमाणेच राहील, परंतु तो महाराष्ट्र राज्यातील अशा ग्राहकांपुरता मर्यादित राहील;

(१३) **"करारांतर्गत मागणी"** म्हणजे किलोव्होल्ट ॲम्पिअर (केव्हीए) किंवा मेगाव्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) मधील वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर-संमतीने जी वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर संमतीने, (एक) वीज पुरवठ्याच्या करारात किंवा (दोन) अन्य लेखी पत्रव्यवहारात, मान्य करण्यात आलेली असेल;

परंतु असे की, मेगाव्होल्ट ॲम्पिअर/किलोव्होल्ट अम्पिअर पासून मेगावॅट/किलोवॉट युनिट मध्ये रुपांतर करण्याच्या प्रयोजनासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल.

(१४) **"दिवस"** म्हणजे ००.०० वाजता सुरु होणारा आणि २४.०० वाजता संपणारा दिवस.

(१५) **"भारतीय विद्युत ग्रिड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ७९ च्या उप-कलम १ च्या खंड (एच्) अंतर्गत केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विनिर्दिष्ट केलेली संहिता;

(१६) **"राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा"** म्हणजे महाराष्ट्र राज्यातील पारेषण यंत्रणा;

(१७) **"दीर्घ-कालिन प्रवेश" किंवा "एलटीओए"** म्हणजे बारा वर्षापेक्षा जास्त परंतु पंचवीस वर्षापेक्षा जास्त नसेल, अशा कालावधीकरीता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(१८) **"मध्यम-कालिन प्रवेश"** म्हणजे तीन महिन्यांपेक्षा जास्त परंतु तीन वर्षांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरीता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(१९) **"महिना"** म्हणजे एक कॅलेंडर महिना;

(२०) **"नोडल एजन्सी"** म्हणजे या विनियमांच्या विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली नोडल एजन्सी;

(२१) **"मुक्त प्रवेश"** चा अर्थ अधिनियमातील कलम २ मधील उप-कलम (४७) मध्ये देण्यात आलेल्या अर्थानुसार राहील;

(२२) **"नूतनशील ऊर्जा"** म्हणजे नूतनशील ऊर्जेचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या आदेशात आणि विनियमांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून ग्रिडमध्ये सामावून घेतली जाऊ शकेल अशा विजेची निर्मिती;

(२३) **"अल्प-कालिन मुक्त प्रवेश"** म्हणजे एका वेळेस एका महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरीता राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्याचा हक्क;

(२४) **"महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र" किंवा "एमएसएलडीसी"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) अंतर्गत स्थापन करण्यात आलेले राज्य भार प्रेषण केंद्र;

(२५) **"विशेष ऊर्जा मीटर"** म्हणजे वेळोवेळी सुधारणा केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण (मीटर बसविणे व प्रचालन) विनियम २००६ नुसार बसविण्यात आलेले मीटर;

(२६) **"राज्य ग्रिड संहिता"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (एच) अंतर्गत आयोगाने विनिर्दिष्ट केलेली राज्य ग्रिड संहिता;

(२७) **"स्ट्रॅन्डेड पारेषण क्षमता"** म्हणजे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील अशी पारेषण क्षमता जी विनियम २७ नुसार दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकांनी मुक्त प्रवेशाचा हक्क सोडून दिल्यामुळे वापराविना पडून राहण्याची शक्यता असते;

(२८) **"पुरवठा करार"** म्हणजे एक किंवा अधिक पुरवठादार आणि एक किंवा अधिक ग्राहक किंवा व्यक्ती यांच्यात मान्य करण्यात आलेल्या अटी व शर्तींवर (वीज दरासह) विजेचा पुरवठा करण्यासाठी करण्यात आलेला करार;

(२९) **"पारेषण क्षमता हक्क"** म्हणजे, सर्वसाधारण परिस्थितीत, ठोक वीज पारेषण करारात निश्चित केलेल्या विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि वीज खेचण्याच्या ठिकाणांमध्ये मेगावॅटमध्ये विजेचे हस्तांतरण करण्याचा पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा हक्क.

(३०) **"काल-गट"** म्हणजे रात्री ००.०० वाजता प्रथम सुरु होणारा वेळेचा प्रत्येकी १५ मिनिटांचा गट ज्यामध्ये विशेष ऊर्जा मीटर्स विनिर्दीष्ट करण्यात आलेले विद्युत मापदंड आणि परिमाण यांची नोंद करतात.

(३१) **"कामाचा दिवस"** म्हणजे असा दिवस ज्या दिवशी बँका व्यवहारासाठी खुल्या असतात;

२.२ (अ) या विनियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि उक्ती ज्यांची व्याख्या अधिनियमात किंवा भारतीय विद्युत ग्रिड संहिता किंवा राज्य ग्रिड संहिता किंवा भारतीय विद्युत पुरवठा संहिता किंवा अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियम आणि अन्य विनियमांमध्ये, जसे असेल तसे, करण्यात आलेली असेल तर अशा शब्द आणि उक्तींचा अर्थ त्यामध्ये देण्यात आलेल्या अर्थानुसार राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दाचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

३ मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता

३.१ या विनियमांतील तरतुदींच्या अधीन राहून,

(एक) महाराष्ट्रातील निर्मिती केंद्र जिच्या मालकीचे आहे किंवा ती ते चालवित असेल किंवा जिची त्याचे मालक बनण्याची किंवा ते चालविण्याचा उद्देश असेल, अशी निर्मिती कंपनी;

(दोन) वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांनुसार मुक्त प्रवेश मिळविण्यास पात्र असलेला ग्राहक ;

(तीन) वितरण परवानाधारक; आणि

(चार) परवानाधारक वीज व्यापारी,

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेशाकरीता अर्ज करण्यास पात्र राहतील.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या संबंधात मुक्त प्रवेशाची मंजुरी या विनियमांतर्गत जोडणीयतेला मंजुरी देण्याच्या अधीन राहील.

परंतु आणखी असे की, परवानाधारक वीज व्यापारी वगळता, पात्र विद्युत कंपन्या जोडणीयता आणि दीर्घ-कालिन किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठी एकाच वेळी अर्ज करु शकतील.

परंतु असेही की, अशी व्यक्ती जी सध्या ग्राहक नसेल आणि जिची जागा वीज घेण्याच्या प्रयोजनासाठी परवानाधारकाच्या कामांशी जोडलेली नसेल, अशी व्यक्ती देखील जोडणीयतेची मंजुरी मागण्यासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेशास मंजुरी मागण्यासाठी पात्र राहील.

४ पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता

४.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा असलेला उपयोगकर्ता हा अशा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा एक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता म्हणून मानण्यात येईलः

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत दीर्घ-कालिन किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेला उपयोगकर्ता, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या मानीव उपयोगकर्त्यासह, पारेषण परवानाधारक आणि राज्य पारेषण कंपनीशी (एसटीयु) ठोक वीज पारेषण करार करतील.

४.२ दीर्घ-कालिन पारेषण यंत्रणेच्या उपयोगकर्त्याला राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत करारद्वारे घेतलेल्या एकूण वीज निर्मिती क्षमतेशी सममूल्य पारेषण क्षमता हक्क असल्याचे मानण्यात येईल;

परंतु असे की, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांका रोजी असलेल्या अशा पारेषण क्षमता हक्कांचा कालावधी, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने वीज निर्मिती क्षमता ज्या करार किंवा अन्य व्यवस्थेखाली प्राप्त केली असेल त्याच्या शिल्लक कालावधी इतका असेल;

भाग बी : जोडणीयता

५. जोडणीयता मंजुर करणे

५.१ ५ मेगावॅट किंवा त्याहून अधिक विद्युत भार असलेला ग्राहक आणि ५ मेगावॅट आणि त्याहून अधिक क्षमता असलेले निर्मिती केद्र, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता घेण्यास पात्र राहील.

परंतु असे की, ५ मेगावॅट पेक्षा कमी स्थापित क्षमता असलेले निर्मिती केंद्र देखील, तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असेल तर, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता मिळवू शकेल;

परंतु आणखी असे की, राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), व्होल्टेजची पातळी आणि क्षमता कितीही असली तरी, अति उच्च दाबाच्या (ईएचव्ही) उप-केंद्रामधून निघालेल्या ग्राहकाधिष्ठित फिडरमार्फत अशा उप-केंद्राशी जोडलेल्या निर्मिती केंद्राला जोडणीयता मंजूर करील;

परंतु आणखी असे की, ३३ केव्ही वरील असे जोडणारा फिडर अधिनियमाच्या कलम २ (७२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे अशा पारेषण वाहिन्यांचा एक भाग असेल;

मेगाव्होल्ट ॲम्पिअर/किलोव्होल्ट ॲम्पिअर पासून मेगावॅट/किलोवॅट युनिट मध्ये रुपांतर करण्याच्या प्रयोजनासाठी युनिटी पॉवर फॅक्टर विचारात घेण्यात येईल.

५.२ जोडणीयतेसाठीच्या अर्जासोबत खालील रकमेचा किंवा आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशा अन्य रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा इलेक्ट्रॉनिक पध्दतीने रक्कम भरणा केल्याचा पुरावा, पाठविण्यात येईल.

अर्जाचा प्रकार	**अर्जाचे शुल्क**
नूतनशील ऊर्जेवर आधारित निर्मात्यांशिवाय अन्य सर्व निर्माते	रुपये दोन लाख
नूतनशील ऊर्जेवर आधारित निर्माते	रुपये एक लाख

५.३ अर्जदार राज्य पारेषण कंपनीकडे परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये जोडणीयतेसाठी अर्ज करील.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी, या विनियमांच्या अधिसूचनेपासून तीस दिवसांच्या आत, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता किंवा मुक्त प्रवेश मिळविण्यासाठीच्या अर्जाकरीता आवश्यक असलेले संबंधित अर्जाचे नमुने, कराराचे नमुने आणि तपशील, दस्तावेज आणि शुल्क त्यांच्या इंटरनेटच्या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात देईल;

परंतु आणखी असे की, अर्ज करण्यात आल्यानंतर अर्जदाराच्या ठिकाणामध्ये कोणताही महत्वाचा बदल झालेला असेल किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आंतरबदल करावयाच्या विजेच्या परिमाणात दहा टक्क्यांहून अधिक बदल झाला असल्यास, अर्जदाराला नवीन अर्ज करावा लागेल, ज्याचा विचार या विनियमांनुसार करण्यात येईल.

परंतु असे की, कोणतीही विद्यमान मुक्त प्रवेश व्यवस्था असा नवीन अर्ज निकाली निघेपर्यंत पुढे चालू राहील.

६. जोडणीयतेसाठीच्या अर्जाची छाननी

६.१ अर्ज प्राप्त झाल्यानंतर, राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), ग्रिडशी जोडणीयतेच्या तांत्रिक मानकाचे नियमन करणाऱ्या केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या संबंधित विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार, आंतर-जोडणीचा अभ्यास करील.

६.२ जोडणीयता मंजूर करताना, राज्य पारेषण कंपनी, जेथे जोडणीयता मंजूर करावयाची आहे त्या उप-केंद्र किंवा स्वीचयार्डचे नाव, डिझाईनची वैशिष्ट्ये जसे की, उप-केंद्रामध्ये अंतःक्षेपित करण्याच्या ठिकाणापर्यंतची स्विचयार्ड आणि आंतरजोडणी

सुविधा आणि अतिरिक्त काम पूर्ण करण्यासाठी लागणारा आवश्यक कालावधी, असल्यास, निर्देशित करील.

६.३ अर्जदार, राज्य पारेषण कंपनी आणि पारेषण परवानाधारक केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या ग्रीडशी जोडणीयतेसाठीच्या तांत्रिक मानकाचे पालन करतील.

६.४ अर्जदार (परवानाधारक वीज व्यापाऱ्याचा त्यात समावेश नाही), राज्य पारेषण कंपनी आणि राज्यांतर्गत पारेषण परवानाधारक, जोडणीयतेची मंजुरी मिळाल्यानंतर त्रिपक्षीय करार करतील, त्याची प्रत राज्य पारेषण कंपनी एमएसएलडीसीला देईल;

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी, या विनियमांच्या अधिसूचनेपासून ३० दिवसांच्या आत, त्यांच्या संकेत-स्थळावर जोडणी कराराचा नमुना प्रदर्शित करील.

६.५ अर्जदार, जोपर्यंत या विनियमांनुसार मुक्त प्रवेशासाठी मान्यता मिळवीत नाही तोपर्यंत, त्याला मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून विजेचा कोणताही आंतरबदल करण्याचा हक्क जोडणीयतेच्या मंजुरीमुळे आपोआप मिळणार नाही.

६.६ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता मंजूर केलेल्या वीज निर्मिती केंद्राला, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून, ग्रिडची सुरक्षितता विचारात घेण्याच्या अधीन राहून, त्यांच्या वाणिज्यिक वापरास सुरुवात करण्यापूर्वी, ग्रिडमध्ये अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण करुन पूर्ण भार चाचणीसह, चाचणी करण्याची परवानगी देण्यात येईल.

६.७ नूतनशील ऊर्जेवर आधारीत वीज निर्मिती केंद्रांव्यतिरिक्त अन्य वीज निर्मिती केंद्राच्या अशा अनिश्चित विजेच्या चाचणीचा आकार आणि वीज दर, बहु-वर्षीय वीज दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार, राहील.

परंतु असे की, अशा चाचणीमुळे निर्मिती केंद्राकडून ग्रिडमध्ये अंतःक्षेपित केलेल्या विजेकरीता आयोगाकडून विजेचे दर निश्चित करण्यात आलेले नसतील, तर ते खालीलपैकी जे कमी असेल त्यानुसार असतील :-

अ) राज्यांतर्गत संतुलन आणि हिशोबपूर्ती संहितेंर्गत आयोगाकडून मान्यता देण्यात आलेल्या यंत्रणा किंवा पध्दतीखाली लागू असल्यानुसार असंतुलनासाठीचा दर

ब) निर्मिती कंपनी ज्या वितरण परवानाधारकाला विजेची विक्री करु इच्छित असेल त्या वितरण परवानाधारकाच्या संबंधात आयोगाने प्रचलित वीज दर आदेशामध्ये मान्यता दिल्यानुसार दीर्घ-कालिन वीज खरेदीचा सरासरी अस्थिर खर्च.

६.८ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणीयता मंजूर केलेल्या निर्मिती केंद्र किंवा संचाला, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आणि पारेषण परवानाधारकाकडून, त्याच्या पहिल्या सिंन्क्रोनायझेशनच्या दिनांकापासून वाणिज्यिक कामकाजास सुरुवात करण्यापूर्वी,

सहा महिन्यापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीकरिता अशी अनिश्चित वीज ग्रिडमध्ये अंतःक्षेपित करण्याची परवानगी देण्यात येईल.

परंतु असे की, या विनियमांच्या प्रयोजनासाठी, वीज निर्मिती कंपनीने अपवादात्मक परिस्थितीत सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्याच्या आत किमान दोन महिने आधी केलेल्या अर्जाबाबत, पारेषण परवानाधारक, केंद्र किंवा संचाने पूर्ण भार चाचणीसह करावयाची चाचणी आणि त्यानंतर करावयाचे अनिश्चित विजेचे अंतःक्षेपण यांचा कालावधी सहा महिन्यांपेक्षा जास्त वाढविण्यास परवानगी देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, वाणिज्यिक कामकाजास सुरुवात करण्याच्या पूर्वी अंतःक्षेपित केलेली अनिश्चित वीज फक्त चाचणी आणि संच सुरु करण्याच्या प्रयोजनासाठी आहे याबाबत पारेषण परवानाधारक, राज्य पारेषण कंपनी आणि महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे समाधान करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती निर्मिती कंपनी त्यांना देईल.

परंतु असेही की, अनिश्चित वीज अंतःक्षेपित करण्यापूर्वी, निर्मिती केंद्र अशा विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवानाधारकाशी करार करील, असा करार केला नसल्यास, ग्रिडमध्ये अंतक्षेपित करण्यात आलेल्या अनिश्चित विजेसाठी कोणताही आकार नसेल, आणि अशी अनिश्चित वीज, महाराष्ट्रात कार्यान्वित असलेल्या राज्यांतर्गत संतुलन आणि हिशोबपूर्ती पध्दतीच्या तरतुदींतर्गत, निर्मिती केंद्र ज्या वितरण परवानाधारकाशी जोडण्यात आलेले असेल त्या वितरण परवानाधारकाच्या नावे जमा करण्यात येईल.

६.९ राज्य पारेषण कंपनी जोडणीयतेच्या मंजुरीबाबत किंवा अन्यथा आपला निर्णय सर्व दृष्टींनी परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत कळवील.

परंतु असे की, राज्य पारेषण कंपनी, अर्जदाराला अर्ज नाकारण्याविरुध्द् निवेदन मांडण्याची संधी दिल्यानंतर, अशा प्रस्तावित नकाराची कारणे नमूद करुन अर्ज नाकारु शकेल.

परंतु असेही की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी आधीच जोडलेल्या किंवा पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेअंतर्गत जोडणीयता मंजूर करण्यात आलेल्या वीज निर्मिती केंद्राला त्याच क्षमतेसाठी जोडणीयतेकरिता अर्ज करण्याची आवश्यकता नसेल.

वीज निर्मिती केंद्राच्या क्षमतेत वाढ झाली तर या विनियमांनुसार जोडणीयतेच्या मंजुरीसाठी नवीन अर्ज करण्यात येईल.

६.१० ग्राहकाच्या करारांतर्गत मागणीत सुधारणा किंवा अन्यथा, वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांनुसार करण्यात येईल.

भाग सी : अर्जाची कार्यपध्दती आणि मंजुरी

७ मुक्त प्रवेशाची वर्गवारी

७.१ अर्ज करावयाची कार्यपध्दती आणि शुल्क आणि अर्जाच्या छाननीची कालमर्यादा या बाबी, आपसात वीज खेचण्याची आणि वीज अंतःक्षेपण करण्याची ठिकाणे, यावर आधारित असतीलः-

(ए) महाराष्ट्र राज्यामध्ये;

(बी) अन्य राज्यांमध्ये.

७.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मागावयाच्या मुक्त प्रवेशाचे स्वरुप आणि कालावधीची खालीलप्रमाणे वर्गवारी करण्यात येईल. :

मुक्त प्रवेशाचा प्रकार	कालावधी
दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश	बारा वर्षांपेक्षा जास्त परंतु पंचवीस वर्षांपेक्षा जास्त नसेल
मध्यम-कालिन मुक्त प्रवेश	तीन महिन्यांपेक्षा जास्त परंतु तीन वर्षांपेक्षा जास्त नसेल
दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश	एक महिन्यापेक्षा जास्त नसेल

परंतु असे की, अर्जदार तीन वर्षे ते बारा वर्षांच्या कालावधीत, एका वेळेस जास्तीत जास्त तीन वर्षांकरिता याप्रमाणे मध्यम-कालिन मुक्त प्रवेशाची मागणी करु शकेल.

८. नोडल एजन्सी आणि मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती

८.१ मुक्त प्रवेशासाठीचा विहित नमुन्यातील अर्ज, विनियम ८.३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले शुल्क आणि अन्य रकमेचा आकार किंवा आयोगाकडून वेळोवेळी ठरवून देण्यात येईल त्या अन्य आकारांच्या रकमेसह, नोडल एजन्सीला सादर करण्यात येईल.

परंतु असे की, विनियम ९, १० आणि ११ मध्ये उल्लेखलेल्या कालमर्यादा, सर्व दृष्टींनी परिपूर्ण असलेला अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

८.२ **नोडल एजन्सी**

८.२.१ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेश घेण्यासाठी, जोडणीयतेच्या मंजुरीकरिता राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ही नोडल एजन्सी राहील;

परंतु असे की, एसटीयु त्यांच्या संकेत-स्थळावर नोडल अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व संपर्काचा तपशील विनिर्दिष्ट करील. सदर नोडल अधिकारी हा या विनियमांनुसार मुक्त प्रवेश आणि जोडणीयतेच्या संबंधातील सर्व बाबीकरिता एकल संपर्काधिकारी राहील.

८.२.२ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत अल्प-कालिन मुक्त प्रवेश मंजुरीकरिता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) ही नोडल एजन्सी राहील;

परंतु असे की, एमएसएलडीसी त्यांच्या संकेत-स्थळावर नोडल अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व संपर्काचा तपशील विनिर्दिष्ट करील. सदर नोडल अधिकारी हा या विनियमांनुसार मुक्त प्रवेश आणि जोडणीयतेच्या संबंधातील सर्व बाबीकरिता एकल संपर्काधिकारी राहील.

८.२.३ आंतर-राज्य पारेषण यंत्रणेत जोडणीयता आणि मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी केंद्र सरकारकडून नोडल एजन्सी विनिर्दिष्ट करण्यात येईल;

८.३ विनियम ९ ते ११ मध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, आंतर-राज्य मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती केंद्रीय आयोगाच्या विनियमांनुसार राहील;

परंतु असे की, आंतर-राज्य मुक्त प्रवेश मागणारा ग्राहक वितरण यंत्रणेला जोडलेला असेल तर, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी), विनियम १२ नुसार संबंधित वितरण परवानाधारकाची संमती घेतल्यानंतर, केंद्रीय आयोगाच्या विनियमांत आवश्यक असल्याप्रमाणे, प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला (आरएलडीसी) आपली संमती देईल.

८.४ नोडल एजन्सी आणि वितरण मुक्त प्रवेश मागणाऱ्या अर्जासोबत पाठवावयाचे दस्तावेज हे खालील तक्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतीलः-

पारेषण मुक्त प्रवेश मागणारा ग्राहक किंवा निर्मिती केंद्र किंवा वितरण परवानाधारक					
अनु. क्र.	**कालावधी**	**अंत:क्षेपण (इंजेक्शन) करण्याचे ठिकाण**	**वीज खेचण्याचे (ड्रॉअल) ठिकाण**	**नोडल एजन्सी**	**अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज**
१	अल्प-कालीन मुक्त प्रवेश	महाराष्ट्रात	महाराष्ट्रात	एमएसएलडीसी	पुरवठा कराराची प्रत
२		महाराष्ट्रात	महाराष्ट्राबाहेर	ग्राहक जेथे स्थित असेल तेथील प्रदेशाचे आरएलडीसी	एमएसएलडीसी आणि वितरण परवानाधारकांची संमती, लागू असेल त्याप्रमाणे, आणि केंद्रीय आयोगाच्या विनियमांच्या अन्य आवश्यकता
३		महाराष्ट्राबाहेर	महाराष्ट्रात	आरएलडीसी	एमएसएलडीसी आणि वितरण परवानाधारकांची संमती, लागू असेल त्याप्रमाणे, आणि केंद्रीय आयोगाच्या विनियमांच्या अन्य आवश्यकता
४		महाराष्ट्रातील पारेषण यंत्रणेच्या ठिकाणी आणि पॉवर एक्स्चेंजला वीज विकत असलेले		एमएसएलडीसी	पॉवर एक्स्चेंजशी संबंधित दस्तावेज, ग्राहकाच्या अगदी अलीकडील विद्युत देयकाची प्रत

पारेषण मुक्त प्रवेश मागणारा ग्राहक किंवा निर्मिती केंद्र किंवा वितरण परवानाधारक					
अनु. क्र.	**कालावधी**	**अंत:क्षेपण (इंजेक्शन) करण्याचे ठिकाण**	**वीज खेचण्याचे (ड्रॉअल) ठिकाण**	**नोडल एजन्सी**	**अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज**
५		-	महाराष्ट्रातील पारेषण यंत्रणेच्या ठिकाणी परंतु पॉवर एक्स्चेंजकडून वीज पुरवठा घेऊ इच्छिणारा	एमएसएलडीसी	पॉवर एक्स्चेंजशी संबंधित दस्तावेज, ग्राहकाच्या अगदी अलीकडील विद्युत देयकाची प्रत
६	मध्यम-कालिन मुक्त प्रवेश	महाराष्ट्रात	महाराष्ट्रात	एसटीयु	पुरवठा कराराची प्रत
७		महाराष्ट्रात	महाराष्ट्राबाहेर	सीटीयु	पुरवठा कराराची प्रत, संबंधित राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवानाधारकाची संमती, लागू असेल त्याप्रमाणे, आणि केंद्रीय आयोगाच्या विनियमांनुसार अन्य आवश्यकता
८		महाराष्ट्राबाहेर	महाराष्ट्रात	सीटीयु	पुरवठा कराराची प्रत, संबंधित राज्य भार प्रेषण केंद्र आणि वितरण परवानाधारकाची संमती, लागू असेल त्याप्रमाणे, आणि केंद्रीय आयोगाच्या विनियमांनुसार अन्य

पारेषण मुक्त प्रवेश मागणारा ग्राहक किंवा निर्मिती केंद्र किंवा वितरण परवानाधारक					
अनु. क्र.	**कालावधी**	**अंत:क्षेपण (इंजेक्शन) करण्याचे ठिकाण**	**वीज खेचण्याचे (ड्रॉअल) ठिकाण**	**नोडल एजन्सी**	**अर्जासोबत जोडावयाचे दस्तावेज**
					आवश्यकता
९	दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश	महाराष्ट्रात	महाराष्ट्रात	एसटीयु	बँकेची हमी, पुरवठा कराराची प्रत,
१०		महाराष्ट्रात	महाराष्ट्राबाहेर	सीटीयु	बँकेची हमी, पुरवठा कराराची प्रत, राज्य पारेषण कंपनी आणि वितरण परवानाधारकांची संमती, लागू असेल त्याप्रमाणे,
११		महाराष्ट्राबाहेर	महाराष्ट्रात	सीटीयु	बँकेची हमी, पुरवठा कराराची प्रत, संबंधित राज्य पारेषण कंपनी आणि वितरण परवानाधारकांची संमती, लागू असेल त्याप्रमाणे,

परंतु असे की, आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीनुसार शुल्क देय राहील.

८.५ अर्जासोबत, जेथे लागू असेल तेथे, खालील दस्तावेज पाठविण्यात येतीलः-

- अर्जदार जर खरेदीदार असेल तर विक्रेत्याची संमती किंवा अर्जदार जर विक्रेता असेल तर खरेदीदाराची संमती
- पुरवठा कराराची प्रत
- वीज व्यापार परवान्याची प्रत

- पॉवर एक्स्चेंज मार्फत वीज पुरवठा मागितला असल्यास संबंधित दस्तावेजांच्या प्रती (नोंदणी/सभासदत्वाचा तपशील, सदस्य-ग्राहक करार इ.)
- जर स्व-वापरासाठी वीज असल्यास, संस्थापन समयलेख (मेमोरंडम ऑफ असोसिएशन) आणि भाग-धारणेबाबत सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्राची प्रत
- अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा
- यापूर्वीच बसविले असल्यास, एसईएम सुरु केल्याचे प्रमाणपत्र

८.६ मुक्त प्रवेशास प्रारंभ होण्यापूर्वी, राज्य पारेषण कंपनी आणि संबंधित वितरण परवानाधारक, आवश्यक वैशिष्ट्ये असलेले 'विशेष ऊर्जा मीटर' (एसइएम) आणि करंट ट्रान्सफॉर्मर (सीटी) /पोटेन्शियल ट्रान्सफॉर्मर (पीटी) बसविण्यासाठी, मीटरसोबतची उपकरणे आणि उपसाधनांची चाचणी संयुक्तपणे करतील.

८.७ स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पामधील विजेच्या मुक्त प्रवेशाबाबत, ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक, वीज व्यापारी, जसे असेल तसे, क्रॉस सबसिडी अधिभार लागू होणार असेल तर, स्व-वापरासाठीच्या निर्मिती प्रकल्पाच्या सद्यस्थितीत कोणताही बदल झाल्यास तो नोडल एजन्सीला दहा दिवसांच्या आत कळवील.

८.८ जर पारेषण यंत्रणेला जोडलेला ग्राहक राज्यांतर्गत पारेषण मुक्त प्रवेश मागत असेल तर, संबंधित वितरण परवानाधारकाला देय असणारा कोणताही आकार हा ग्राहक ज्या वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात स्थित असेल त्या वितरण परवानाधारकाला देय राहील.

८.९ या विनियमांमध्ये काहीही नमूद करण्यात आले असले तरी, या विनियमांमधील मुक्त प्रवेशाची तरतूद, ज्या राज्य पारेषण कंपनी, एमसएलडीसी, वितरण परवानाधारक आणि पारेषण परवानाधारक यांच्याकडून जोडणीयता प्राप्त करण्यात आली असेल त्यांना देय असलेल्या सर्व रकमांची हिशोबपूर्ती करण्याच्या अधीन असेल;

परंतु असे की, अशा देय रकमाबाबत वाद असला तर, या वादाचे निराकरण होईपर्यंत, अधिनियमाच्या कलम ५६ नुसार विवादित रकमेइतकी अनामत संबंधित विद्युत कंपनीकडे जमा केल्यानंतर, अर्जदाराला मुक्त प्रवेशास परवानगी देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, वादाचे निराकरण झाल्यानंतर, अर्जदाराला परत करण्यात येणाऱ्या अनामत रकमेच्या शिल्लक भागावर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या बँक दराच्या सममूल्य दराने व्याज अदा करण्यात येईल.

८.१० अर्जासोबत पाठवावयाच्या पुरवठा करारामध्ये एमएलडीसीला स्वस्त वीज आधी खरेदी करणे (मेरीट ऑर्डर डिस्पॅच) शक्य व्हावे यासाठी वीज पुरवठ्याकरीता स्थिर आणि अस्थिर आकार किंवा संयुक्त आकार निर्देशित करण्यात येतील.

८.११ नोडल एजन्सी, जर परिणामस्वरुप निर्माण होणारा विद्युत प्रवाह हा विद्यमान पारेषण यंत्रणेमध्ये किंवा कार्यान्वित करण्यात येत असलेल्या पारेषण यंत्रणेमध्ये सामावून घेणे शक्य असेल तर, मध्यम-कालिन किंवा अल्प-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करील.

८.१२ या विनियमांच्या अधिसूचनेपासून नव्वद दिवसांच्या आत, नोडल एजन्सी जोडणीयतेकरिता आणि मुक्त प्रवेशाकरीता ऑन-लाईन अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देईल.

९. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाची कार्यपध्दती खालील तरतुदींनुसार असेल –

९.१ दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी परिशिष्ट-३ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यामध्ये नोडल एजन्सीकडे अर्ज करण्यात येईल :

परंतु असे की, जेव्हा मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठी पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असेल आणि विजेचे अंतःक्षेपण करण्याचे व वीज खेचण्याचे परिमाण जर निश्चित करण्यात आले नसेल, तर अर्जदार अशा विजेचे अपेक्षित परिमाण सूचक तत्त्वावर कळवील.

परंतु आणखी असे की, वीज पुरवठ्याचा विशिष्ट स्रोत किंवा वीज जोडणी घेण्याचे ठिकाण, जसे असेल तसे, नोडल एजन्सीला, दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश प्राप्त करुन घेण्याच्या उद्देशित दिनांकाच्या कमीत कमी तीन वर्षे आधी किंवा पारेषण यंत्रणेच्या वाढीकरिता नोडल एजन्सीने अंदाजित केलेला अन्य कालावधी, जो कमी असेल तो, कळविणे आवश्यक आहे;

परंतु असेही की, अर्जदाराच्या वीज खेचण्याच्या किंवा वीज अंतःक्षेपित करण्याच्या ठिकाणात कोणताही बदल झाला असल्यास किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करुन विजेच्या आंतरबदल करावयाच्या परिमाणात १० टक्यापेक्षा जास्त बदल झाला असल्यास, नवीन अर्ज करण्यात येईल.

९.२ **बँकेची हमी**

(अ) अर्जासोबत, नोडल एजन्सीच्या नावे खाली नमूद केलेल्या रकमांकरीता किंवा आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात यईल अशा अन्य रकमांकरीता, बँकेची हमी

पाठविण्यात येईल. बांधकामास सुरुवात होण्यापूर्वी अतिरिक्त बँक हमी सादर करण्याची आवश्यकता राहील.

अर्जाचा प्रकार	**मुक्त प्रवेशाच्या प्रति मेगावॅटकरिता बँक हमीची रक्कम**
नूतनशील ऊर्जेवर आधारित व्यवहारांशिवाय अन्य सर्व व्यवहार	रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार)
नूतनशील ऊर्जेवर आधारित व्यवहार	रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार)

(ब) सदर बँक हमी ही वैध आणि अंमलात राहील जोपर्यंत

१) ठोक वीज पारेषण कराराची अंमलबजावणी करण्यापर्यंत, जेथे पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता असेल किंवा

२) दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश कार्यान्वित होईपर्यंत, जेथे पारेषण यंत्रणेमध्ये वाढ करण्याची आवश्यकता नसेल

(क) बँक गॅरेटी अर्जदाराला - (१) ठोक वीज पारेषण करारावर सही झाल्यानंतर किंवा (२) असा अर्ज नामंजूर करण्यात आल्यानंतर, पंधरा दिवसांच्या आत - अर्जदाराला परत करण्यात येईल.

(ड) बँक हमीचे नोडल एजन्सीकडून रोखीकरण करण्यात येईल जर

- अर्जदाराकडून मुक्त प्रवेशाचा अर्ज मागे घेण्यात आला तर किंवा
- जेथे पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता नसेल अशा प्रकरणी जर दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाचे हक्क ते कार्यान्वित होण्यापूर्वी सोडून देण्यात आले तर .
- राज्य पारेषण कंपनी किंवा पारेषण परवानाधारकाने पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची आवश्यकता असताना बांधकाम चालू होण्यापूर्वी, अर्जदार अतिरिक्त बँक हमी सादर करु शकला नाही तर.

९.३ अर्ज प्राप्त झाल्यानंतर, नोडल एजन्सी मुक्त प्रवेश व्यवहारांकरीता सर्व परवानग्या, मंजुऱ्या, जशी आवश्यकता असेल त्याप्रमाणे, वितरण परवानाधारक, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, राज्य पारेषण कंपनी आणि अन्य संस्थांकडून प्राप्त करुन घेईल.

९.४ नोडल एजन्सी दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासंबंधीचा आपला निर्णय १२० दिवसांच्या आत, जर पारेषण यंत्रणेत वाढ करण्याची गरज नसेल तर, आणि अन्यथा १८० दिवसांच्या आत, कळवील.

९.५ यंत्रणेच्या अभ्यासाच्या आधारे, नोडल एजन्सी दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश देण्यासाठी कराव्या लागणाऱ्या आवश्यक वाढीसह राज्यांतर्गत पारेषण व्यवस्था सूचित करील आणि अर्जदाराला असा मुक्त प्रवेश ज्या दिनांकापासून देता येईल ती तारीख आणि लागू असलेले आकार कळवील.

९.६ अर्जदार, राज्य पारेषण कंपनी आणि पारेषण परवानाधारक या विनियमांनुसार दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशासाठी ठोक वीज पारेषण करार करतील.

९.७ दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश देण्यात आल्यानंतर नोडल एजन्सी तसे महाराष्ट राज्य भार प्रेषण केंद्राला ताबडतोब कळवील ज्यामुळे या केंद्राला ठोक वीज पारेषण करारांतर्गत प्राप्त झालेल्या विजेच्या शेड्युलिंगसाठीच्या विनंत्यांची छाननी करताना, तो विचारात घेणे शक्य होईल.

९.८ दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाचा कालावधी संपल्यानंतर, ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, यांना या मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी कोणतेही प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

९.९ नोडल एजन्सीकडून कोणताही अर्ज लेखी कारणे पत्र आणि इलेक्टॉनिक माध्यमातून कळविल्याशिवाय नाकारण्यात येणार नाही.

९.१० या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य पारेषण कंपनीकडून न इंटरनेटवरील त्यांच्या संकेत-स्थळावर ठोक वीज पारेषण कराराचा नमुना उपलब्ध करण्यात येईल.

१०. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मध्यम-कालिन मुक्त प्रवेशाची कार्यपध्दती खालील तरतुदींनुसार असेल –

१०.१ मध्यम-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीचा अर्ज परिशिष्ट- ३ मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात नोडल एजन्सीकडे करण्यात येईल.

१०.२ मुक्त प्रवेश सुरु होण्याच्या उद्देशित दिनांकापूर्वी ३ महिने ते १२ महिने अगोदर नोडल एजन्सीकडे अर्ज करण्यात येईल.

उदाहरण :- १ ऑगस्ट, २०१६ रोजी मुक्त प्रवेशास प्रारंभ होणार असेल तर त्याच्या मंजुरीसाठी १ ऑगस्ट, २०१५ ते एप्रिल, २०१६ चा शेवटचा दिवस या दरम्यान केव्हाही अर्ज करण्यात येईल.

१०.३ अर्ज प्राप्त झाल्यानंतर, नोडल एजन्सी मुक्त प्रवेश व्यवहारांकरीता सर्व परवानग्या, मंजुऱ्या, वितरण परवानाधारक, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, पारेषण परवानाधारक आणि अन्य संस्थांकडून प्राप्त करुन घेईल.

१०.४ नोडल एजन्सी मुक्त प्रवेश मंजूर किंवा नामंजूर करण्यासंबंधीचा आपला निर्णय ६० दिवसांच्या आत पत्र आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून कळवील. कालावधीकरीता मध्यम-कालिन मुक्त प्रवेश मंजूर करील.

परंतु असे की, नोडल एजन्सी मध्यम-कालिन मुक्त प्रवेश अर्जात अर्जदाराने मागितलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीकरीता, त्यासंबधीची कारणे पत्राद्वारे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमातून लेखी नमूद करुन, मंजूर करु शकेल.

१०.६ त्यानंतर, अर्जदार, राज्य पारेषण कंपनी आणि पारेषण परवानाधारक या विनियमांनुसार ठोक वीज पारेषण करार करतील.

१०.७ मध्यम-कालिन मुक्त प्रवेश देण्यात आल्यानंतर नोडल एजन्सी तसे महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला ताबडतोब कळवील, ज्यामुळे या केंद्राला ठोक वीज पारेषण करारांतर्गत प्राप्त झालेल्या विजेच्या शेड्युलिंगसाठीच्या विनंत्यांची छाननी करताना, तो विचारात घेणे शक्य होईल.

१०.८ मध्यम-कालिन मुक्त प्रवेशाचा कालावधी संपल्यानंतर, मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाला, जसे असेल तसे, कोणतेही प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

१०.९ नोडल एजन्सीकडून कोणताही अर्ज लेखी कारणे पत्र आणि इलेक्टॉनिक माध्यमातून कळविल्याशिवाय नाकारण्यात येणार नाही.

११. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत अल्प-कालिन मुक्त प्रवेशाची कार्यपध्दती खालील तरतुदींना अनुसरुन असेल –

११.१ डे-अहेड मुक्त प्रवेशा व्यतिरिक्त आगाऊ मुक्त प्रवेश

ए) अल्प-कालिन मुक्त प्रवेश मागण्यासाठी अर्ज नोडल एजन्सीकडे करण्यात येईल व ही एजन्सी त्याची एक प्रत ताबडतोब, निर्मिती केंद्र आणि/किंवा ग्राहक ज्या वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात स्थित असेल, त्या वितरण परवानाधारकाला पत्राने आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून पाठवील.

बी) नोडल एजन्सीकडे अर्ज, अल्प-कालिन मुक्त प्रवेशास सुरुवात होण्याच्या चार महिने अगोदर परंतु मागील महिन्याच्या दहाव्या दिवसापर्यंत, करण्यात येईल.

उदाहरणः- ऑगस्ट महिन्यातील अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी अर्ज १ एप्रिल ते १० जुलै दरम्यान सादर करण्यात येईल.

सी) प्रत्येक महिन्यासाठी आणि विजेच्या अंतःक्षेपण (इंजेक्शन) करण्याची किंवा खेचणीची (ड्रॉअल) ठिकाणे वेगवेगळी असतील तर महिन्यातील प्रत्येक व्यवहारासाठी वेगळा अर्ज करण्यात येईल.

परंतु असे की, स्व-वापरासाठीची वीज निर्मिती कंपनी एकल अंतःक्षेपण ठिकाण आणि वीज खेचणीच्या बहुविध ठिकाणांकरिता एकच अर्ज करु शकेल.

महिन्याच्या दहाव्या दिवसापर्यंत प्राप्त झालेले सर्व अर्ज एकाच वेळी प्राप्त झाल्याचे मानण्यात येईल.

मुक्त प्रवेशासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, नोडल एजन्सी मुक्त प्रवेश व्यवहारांकरीता सर्व परवानग्या, मंजुऱ्या, जशी आवश्यकता असेल त्यानुसार, वितरण परवानाधारक, राज्य पारेषण कंपनी आणि अन्य संस्थांकडून प्राप्त करुन घेईल.

डी) अपेक्षित अतिभारासंबंधी नोडल एजन्सीने घेतलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहील.

इ) जर नोडल एजन्सीच्या मते अतिभाराची होण्याची शक्यता असेल तर, अर्ज सादर करण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतर नोडल एजन्सी बोलीच्या कार्यपध्दतीनुसार आगाऊ शेड्युलिंगसाठी इलेक्ट्रॉनिक बोली आमंत्रित करु शकेल.

एफ) **बोलीसाठीची कार्यपद्धती**

(एक) नोडल एजन्सी अशा अतिभाराबाबतचा तपशील आणि किमान किंमतीचा निर्देश करुन बोली प्रकियेसाठी आमंत्रण पाठविण्याचा निर्णय अर्जदारांना परिशिष्ट-२ मधील नमुन्यात (नमुना अ.का.-३) कळवील.

(दोन) नोडल एजन्सी बोलीबाबतची माहिती त्यांच्या इंटरनेटवरील संकेत स्थळावर देखील प्रदर्शित करील.

(तीन) आयोगाच्या संबंधित आदेशाच्या आधारे निश्चित करण्यत आलेली पारेषण आकारांची किमान किंमत परिशिष्ट - २ (नमुना-अ.का.-३) मध्ये निर्देशित करण्यात येईल.

(चार) परिशिष्ट -२ मधील नमुन्यात बोलीसाठीच्या आमंत्रणात (नमुना-अ.का.-३) निर्देशित केलेल्या बोली बंद व्हावयाच्या वेळेपर्यंत नमुन्यामधील बोली (नमुना अ.का.-४) मध्ये स्वीकारण्यात येईल.

(पाच) बोली एकदा सादर केल्यानंतर, त्यात फेरबदल करता येणार नाहीत.

(सहा) एखाद्या अर्जदाराने जर बोली प्रक्रियेत भाग घेतला नाही तर त्याचा अर्ज मागे घेण्यात आला आहे असे मानण्यात येईल.

(सात) नोडल एजन्सीकडून बोली सादर करण्यासाठीची मुदत वाढविण्यासाठी करण्यात आलेली कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(आठ) ज्या परिमाणात किमान किंमत निश्चित करण्यात आली असेल त्याच परिमाणात, बोलीदार त्यांची किंमत (पूर्णांकात) नमूद करील.

(नऊ) नमूद (क्वोट) करण्यात आलेली किंमत उतरत्या क्रमाने मांडण्यात येईल आणि उपलब्ध क्षमतेचे वाटप, उपलब्ध क्षमता संपेपर्यंत, अशा क्रमाने करण्यात येईल.

(दहा) दोन किंवा अधिक अर्जदारांनी एकच किंमत नमूद केली असल्यास, उरलेल्या उपलब्ध क्षमतेचे वाटप अशा अर्जदारांनी मागणी केलेल्या क्षमतेच्या यथा-प्रमाणात करण्यात येईल.

(अकरा) ज्या अर्जदारांना पूर्ण क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोली प्रक्रियेमध्ये मिळालेली उच्चतम किंमत अदा करतील.

(बारा) ज्या अर्जदारांना त्यांनी मागितलेल्या क्षमतेपेक्षा कमी क्षमतेचे वाटप करण्यात आले आहे ते, बोलीमध्ये त्यांनी नमूद (क्वोट) केलेली किंमत अदा करतील.

(तेरा) ज्या बोली कोणत्याही प्रकारे अपूर्ण, अस्पष्ट किंवा बोलीच्या कार्यपध्दतीस अनुसरुन नसल्याचे आढळून येतील त्या बोली नोडल एजन्सीकडून नाकारण्यात येतील.

(चौदा) यशस्वी बोलीदार, ज्याला क्षमतांचे वाटप करण्यात आले आहे, बोली प्रक्रियेत निश्चित करण्यात आलेले पारेषण आकार आणि/किंवा वहन आकार, जसे असेल तसे, अदा करतील.

जी) नोडल एजन्सी मुक्त प्रवेशाची मंजुरी किंवा अन्यथा परिशिष्ट-२ (नमुना-अ.का.-२) मधील नमुन्यात तसेच त्याबरोबर अर्जदाराने करावयाच्या आवश्यक प्रदांनांचे वेळापत्रक, कामाच्या दहा दिवसांत कळवील.

एच) अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी करावयाच्या अर्जाचा नमुना परिशिष्ट-२ मध्ये (नमुना-अ.का.-१) देण्यात आला आहे.

आय) नोडल एजन्सीकडून कोणताही अर्ज लेखी कारणे, पत्र आणि इलेक्टॉनिक माध्यमातून कळविल्याशिवाय नाकारण्यात येणार नाही.

११.२ डे-अहेड मुक्त प्रवेश

ए) पारेषण यंत्रणेमध्ये शिल्लक क्षमता उपलब्ध असेल तरच, डे-अहेड मुक्त प्रवेशाला परवानगी देण्यात येईल.

बी) डे-अहेड मुक्त प्रवेश मंजूर करण्यासाठीचा अर्ज डे-अहेड व्यवहाराचे काल व परिमाण निश्चित करण्याच्या (शेड्युलिंग) दिनांकाच्या फक्त एकच दिवस आधी, दुपारी १२.०० वाजेपर्यंत, नोडल एजन्सीकडे करण्यात येईल आणि सर्व अर्ज एकाच वेळी प्राप्त झाले आहेत असे मानण्यात येईल व सर्व अर्जांना सारखेच प्राधान्य राहील.

उदाहरण : १५ ऑगस्ट रोजीच्या डे-अहेड व्यवहारासाठी अर्ज फक्त १४ ऑगस्ट रोजी १२.०० वाजेपर्यंतच स्वीकारण्यात येतील.

परंतु असे की, शेड्युलिंगच्या दिनांकाच्या लगतच्या एक दिवस आधी दुपारी १२.०० नंतर किंवा शेड्युलिंगच्या दिनांकाच्या त्याच दिवशी प्राप्त झालेला अर्ज हा तातडीचा अर्ज म्हणून विचारात घेण्यात येईल आणि अशा तातडीच्या अर्जाकरिता छाननी शुल्क हे लागू असलेल्या छाननी शुल्काच्या पाचपट राहील.

सी) नोडल एजन्सी अतिभाराबाबत तपास करील आणि मंजुरी किंवा अन्यथा परिशिष्ट-२ (नमुना-अ.का.-२) मध्ये शेड्युलिंगच्या व्यवहाराच्या दिनांकाच्या लगतच्या आधीच्या दिवशी दुपारी १४.०० वाजेपर्यंत कळवील.

डी) अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या अर्जासंबंधातील सर्व अन्य तरतुदी डे-अहेड मुक्त प्रवेशाच्या अर्जाला देखील लागू होतील.

इ) नोडल एजन्सीकडून कोणताही अर्ज लेखी कारणे पत्र आणि इलेक्टॉनिक माध्यमातून कळविल्याशिवाय नाकारण्यात येणार नाही.

११.३ अल्प-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाने, जसे असेल तसे, राखीव ठेवलेली क्षमता हस्तांतरित करता येणार नाही.

११.४ अल्प-कालिन मुक्त प्रवेशाचा कालावधी संपल्यानंतर, मुदतीचे नूतनीकरण करण्यासाठी ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाला कोणतेही प्राधान्य मिळण्याचा हक्क नसेल.

११.५ अल्प-कालिन मुक्त प्रवेशाचाचा वापर न केल्यास

ए) जर ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, त्याला वाटप करण्यात आलेल्या क्षमतेचा पूर्णपणे किंवा बहुतांश भागाचा वापर चार किंवा अधिक तासात करु शकला नाही तर तो तसे नोडल एजन्सीला कळवील आणि अशा क्षमतेचा वापर करणे सोडून देईल परंतु मूळ राखीव क्षमतेला आणि कालावधीकरिता लागू असलेले पारेषण आकार अदा करील.

परंतु असे की, जर नोडल एजन्सी अशा क्षमतेचे फेर-वाटप करु शकली तर, ज्या व्यक्ती/संस्थेने (एन्टीटी) ही क्षमता परत केली असेल, त्याला नोडल एजन्सीने फेर-वाटप केलेल्या क्षमतेच्या रक्कम आणि कालावधीच्या आधारे, परत करील.

बी) नोडल एजन्सी, बाधित पक्षकाराला नोटीस देऊन, कमी वापरलेल्या क्षमतेच्या मर्यादेपर्यंत, वाटप केलेली क्षमता रद्द करील किंवा कमी करील

(१) तीन दिवसांपेक्षा अधिक दिवसांकरीता अशा क्षमतेचा कमी वापर केला गेला असेल; किंवा

(२) ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, जसे असेल तसे, त्याला वाटप केलेल्या क्षमतेचा वापर करु शकत नसल्याचे एसटीयु किंवा एमएसएलडीसीला कळवू शकला नसेल तर.

सी) अशी क्षमता परत किंवा रद्द करण्यात आल्यामुळे, उपलब्ध झालेल्या शिल्लक क्षमतेचे वाटप प्रलंबित अर्जांच्या क्रमवारीनुसार अन्य कोणत्याही अल्प-कालिन मुक्त प्रवेश अर्जदाराला करता येईल.

१२ राज्य पारेषण कंपनी, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र किंवा वितरण परवानाधारकाची संमती

१२.१ आंतर-राज्य मुक्त प्रवेशः

राज्य पारेषण कंपनी, दीर्घ-कालिन आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशाच्या अर्जाच्या मंजुरीबाबत आणि महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या

मंजुरीबाबत, त्याची संमती अथवा अन्यथा, आंतर-राज्य पारेषणाशी जोडणीयता आणि मुक्त प्रवेशाच्या मंजुरीचे नियमन करणाऱ्या केंद्रीय आयोगाच्या तरतुदीनुसार, कळवील.

परंतु असे की, अर्जदार वितरण परवानाधारकाचा ग्राहक असल्यास, सदर वितरण परवानाधारक विनियम १२.२ मध्ये नमूद केलेले घटक विचारात घेऊन, त्याची संमती अथवा नकार खालील कालमर्यादेत कळवील-

- अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या सात दिवसांच्या आत, किंवा
- मध्यम-कालिन आणि दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत, अर्जदाराची अशी विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या दहा दिवसांच्या आत.

१२.२ **राज्यांतर्गत मुक्त प्रवेश :**

(ए) मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी आलेल्या अर्जाची छाननी करताना, नोडल एजन्सी खालील बाबींची पडताळणी करीलः –

(एक) राज्य ग्रिड संहितेमधील तरतुदींनुसार काल-गट-निहाय ऊर्जेचे मीटरींग करण्यासाठी आणि हिशोब ठेवण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा; आणि

(दोन) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील क्षमता;

(तीन) वीज खरेदीचा दर नमूद असलेली वीज खरेदी कराराची प्रत;

(चार) विक्रेता किंवा खरेदीदाराची, जसे असेल तसे, मान्यता;

(पाच) नोडल एजन्सीने संबंधित वितरण परवानाधारक/परवानाधारकांची वितरण मुक्त प्रवेशासाठी प्राप्त केलेली मान्यता;

(सहा) वीज निर्मिती केंद्राच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्रात रिअल-टाईम दर्शनक्षमता (व्हिजिबिलिटी); आणि

(सात) वीज निर्मिती केंद्राच्या बाबतीत, मुक्त प्रवेशास सुरुवात होण्यापूर्वीचा वाणिज्यिक कामकाजाचा दिनांक.

(बी) अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या दोन दिवसांच्या आत, नोडल एजन्सी, अर्जातील कोणतीही त्रुटी कळवील.

(सी) अर्ज योग्य असल्याचे आढळून आले परंतु नोडल एजन्सीने संमती देण्याचे नाकारले तर असा नकार, त्याबाबतच्या कारणांसह, अर्ज प्राप्त झाल्यापासून कामाच्या तीन दिवसांच्या आत अर्जदाराला पत्राने तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनही कळविण्यात येईल.

(डी) अर्जदार जर वितरण परवानाधारकाचा ग्राहक असेल तर, नोडल एजन्सी मुक्त प्रवेशासाठी वितरण परवानाधारकाची संमती मागेल, वितरण परवानाधारक त्याची संमती अथवा नकार खालील प्रमाणे कळवील -

- अल्प-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या पाच दिवसांच्या आत;
- मध्यम-कालिन आणि दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशांच्या बाबतीत अर्जदाराची अशी विनंती प्राप्त झाल्यापासून कामाच्या दहा दिवसांच्या आत.

१३ वाटप करण्यासाठी प्राधान्य

१३.१ अल्प-कालिन मुक्त प्रवेश वगळून, जर राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये क्षमता उपलब्ध असेल तर, नोडल एजन्सी मुक्त प्रवेशासाठी आलेल्या अर्जांचा विचार 'प्रथम आलेल्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर करील.

१३.२ जर एकाच दिवशी दोन किंवा अधिक अर्ज आले तर, खालील तक्त्यामध्ये दाखविल्यानुसार प्राधान्य देण्यात येईलः-

मुक्त प्रवेशासाठी प्राधान्य	वाटप
प्राधान्य-१ सर्वोच्च	वितरण परवानाधारक - (जरी मुक्त प्रवेश दीर्घ-कलिन, मध्यम-कालिन किंवा अल्प-कालिन मागण्यात आला असला तरी)
प्राधान्य-२	अन्य दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश अर्जदार
प्राधान्य-३	अन्य मध्यम-कालिन मुक्त प्रवेश अर्जदार
प्राधान्य-४-सर्वात कमी	अन्य अल्प-कालिन मुक्त प्रवेश अर्जदार

परंतु असे की, जर एकाच दिवशी दोन किंवा अधिक अर्जदारांकडून सारख्याच कालावधीसाठी मुक्त प्रवेश मागणीचे अर्ज प्राप्त झाले तर ते बरोबरच हाताळण्यात येतील आणि जर सर्व अर्जांची मागणी भागविण्याइतकी पुरेशी क्षमता उपलब्ध नसेल तर अर्जदारांना उपलब्ध क्षमतेचे, त्यांनी मागितलेल्या क्षमतेच्या यथाप्रमाणात, भाग देण्यात येतील.

१३.३ नोडल एजन्सी, या विनियमांच्या अधिसूचनेपासून तीस दिवसांच्या आत, आवश्यक माहिती, मार्गदर्शक सूचना, जोडणी करार आणि मॉडेल ठोक पारेषण कराराचा नमुना, इंटरनेटवरील त्यांच्या संकेत-स्थळावर, उतरवून घेण्याच्या स्वरुपात, उपलब्ध करुन देईल.

परंतु असे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ अंतर्गत निर्गमित केलेल्या कराराचे नमुने, हे विनियम निर्गमित करण्यात येईपर्यंत आणि संकेत-स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईपर्यंत वापरण्यात येतील, आणि हे कराराचे नमुने आणि या विनियमांच्या तरतुदींमध्ये कोणतीही विसंगती आढळली तर त्याचा अर्थ उद्देशाच्या वापरासाठी पूरक असा काढण्यात येईल.

भाग डी : मुक्त प्रवेशासाठी आकार

१४. पारेषण आकार

१४.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता नोडल एजन्सीला खालील आकार अदा करील :-

(ए) आंतर-राज्य पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी - केंद्रीय आयोगाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे;

(बी) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी - आयोगाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे.

१४.२ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, त्याने क्षमता हक्कासाठी अदा केलेल्या पारेषण आकाराचा परतावा, त्याने क्षमता हक्क वापरले नाही तरी, मागण्याचा त्याला हक्क असणार नाही.

१४.३ राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठीचे आकार मासिक तत्वावर निश्चित करण्यात येतील आणि अदा करण्यात येतील.

१४.४ राज्य पारेषण कंपनीकडून मागील महिन्यासाठीच्या आकारांचे देयक प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेला पाठविण्यात येईल.

१४.५. मुक्त प्रवेश प्राप्त करणाऱ्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला, त्याला वाटप करण्यात आलेल्या पारेषण क्षमता हक्कांपेक्षा अधिक वापरलेल्या क्षमतेकरिता, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापरासाठी पारेषण आकारांच्या पंचवीस टक्के अतिरिक्त नियामक आकार देखील अदा करावे लागतील,

१४.६ ज्या ग्राहकाने वितरण परवानाधारकाशी पुरवठा करार केलेला आहे, परंतु तो राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडलेला असेल, तर त्याला देखील क्रॉस सबसिडी अधिभार आणि अतिरिक्त अधिभार, लागू असेल त्याप्रमाणे, अदा करावा लागेल.

१४.७ नोडल एजन्सी अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाकडून, जसे असेल तसे, लागू असलेले पारेषण आकार वसूल केल्यानंतर सात दिवसांच्या आत राज्य पारेषण कंपनीला अदा करील.

१४.८ अधिनियम किंवा त्याखालील कोणत्याही अन्य विनियमांतर्गत कोणत्याही अन्य कृतीला, ज्यास नोडल एजन्सी जबाबदार असेल त्यास, बाधा न आणता, नोडल एजन्सी कोणत्याही विलंबित प्रदानावर, बहु-वर्षीय वीज दराच्या निश्चितीकरणाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियामांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दराने, विलंब भरणा अधिभार देण्यास जबाबदार राहील.

१५. काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि यंत्रणा प्रचालन आकार

मुक्त प्रवेश प्राप्त करणाऱ्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांद्वारे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आणि यंत्रणा प्रचालन आकार खाली नमूद केलेल्या दराने देय राहतील:-

१५.१ आंतर-राज्य मुक्त प्रवेशांसाठी :

(एक) अधिनियमाच्या कलम २८ (४) अंतर्गत केंद्रीय आयोगाने ठरवून दिल्याप्रमाणे, प्रादेशिक भार प्रेषण केंद्राचे शुल्क आणि आकार;

(दोन) अधिनियमाच्या कलम ३२ च्या उप-कलम (३) अंतर्गत आयोगाने ठरवून दिलेले महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क आणि आकार.

१५.२ राज्यांतर्गत मुक्त प्रवेशांच्या बाबतीत

वितरण परवानाधारकाने देय असलेले महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क व आकार यांची विभागणी, दीर्घ-कालिन व मध्यम-कालिन मुक्त प्रवेश प्राप्त करणाऱ्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांमध्ये, मुक्त प्रवेशाची मागितलेली निर्धारित मागणी व वितरण परवानाधारकाची एकूण मागणी यांच्यातील गुणोत्तराने, यथाप्रमाण तत्त्वाच्या आधारे, करण्यात येईल.

परंतु असे की, आयोगाने मान्यता दिलेले शेड्युलिंग आणि अन्य प्रचालन आकार अल्प-कालिन मुक्त प्रवेश प्राप्त करणाऱ्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याला लावण्यात येतील.

परंतु असे की, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे शुल्क व आकार लावण्यासाठी, आयोगाने वेळोवेळी स्वतंत्र आदेशाद्वारे किंवा कोणत्याही अन्य विनियमांद्वारे, कोणत्याही अन्य पध्दतीला मान्यता दिली तर, अशी पध्दत लागू होईल.

भाग इ - काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग), मीटर बसविणे, सुधारणा आणि हानि

१६. काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग)

१६.१ आंतर-राज्य मुक्त प्रवेश व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) भारतीय विद्युत ग्रिड संहितेमधील तरतुदींनुसार करण्यात येईल.

१६.२ १ मेगावॅट किंवा अधिक भाराचे ग्राहक आणि सर्व निर्मिती केंद्रे - त्यांची क्षमता कितीही असली तरी, यांच्याबाबतीत राज्यांतर्गत मुक्त प्रवेशाच्या व्यवहारांचे काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून राज्य ग्रिड संहितेनुसार करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाचा अंशकालिन मुक्त प्रवेश ग्राहक त्याचे शेड्युल महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राऐवजी वितरण परवानाधारकाला सादर करील.

१६.३ नूतनशील ऊर्जेच्या दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांत "अनिश्चित वीज" निर्मिती करणारा म्हणून ठरविलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती प्रकल्पाला शेड्युलिंगमधून, आयोग जोपर्यंत अन्य ठरवून देत आही किंवा विनिर्दिष्ट करीत नाही तोपर्यंत, सूट देण्यात येईल.

१७. मीटर बसविणे आणि संदेशवहन

१७.१ सर्व मुक्त प्रवेश ग्राहक आणि निर्मिती केंदे, त्यांची क्षमता कितीही असली तरी, विशेष ऊर्जा मीटर्स (स्पेशल एनर्जी मीटर- एस ई एम) बसवतील.

परंतु असे की, मुक्त प्रवेश ग्राहक किंवा निर्मिती केंद्रे, राज्य पारेषण कंपनीला अशा मुक्त प्रवेश ग्राहक किंवा निर्मिती केंद्राच्या खर्चाने, जसे असेल तसे, असे विशेष ऊर्जा मीटर्स बसविण्याची विनंती करु शकतील.

१७.२ केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या मीटरींग संबंधीच्या मानकांचे पालन पारेषण यंत्रणा उपयोगकर्ते, राज्य पारेषण कंपनी आणि महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र करील.

परंतु असे की, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधील सर्व आंतर-जोडणी ठिकाणे आणि मीटर बसविण्याची ठिकाणे, राज्य ग्रिड संहितेमध्ये संदर्भित केलेल्या मीटर बसविण्याच्या संहितेची (मीटरिंग कोडची) पूर्तता करतील.

परंतु आणखी असे की, ऊर्जा लेखे सुलभ करण्यासाठी, मीटरींग संहितेमध्ये व्याख्या न केलेली आंतर-जोडणी आणि मीटर बसविण्याची ठिकाणे, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून ठरवून दिल्यानुसार असतील.

कोणत्याही ग्राहकाला (ज्याने मुक्त प्रवेश मागितला नसेल अशा ग्राहकासह), भविष्यात मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून वीज घेण्यासाठी तयार असण्यासाठी असे विशेष ऊर्जा मीटर हवे असेल तर, असा ग्राहक त्याच्या खर्चाने असे मीटर बसविण्याची विनंती राज्य पारेषण कंपनीला करु शकेल.

१७.३ पूर्ण पारेषण मुक्त प्रवेश घेणारे उपयोगकर्ते महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला आवश्यक असलेली मीटरींगबाबतची सर्व माहिती पुरवतील.

१७.४ सर्व पूर्ण पारेषण मुक्त प्रवेश घेणारे उपयोगकर्ते आणि पारेषण यंत्रणेला जोडलेली निर्मिती केंद्रे, राज्य पारेषण कंपनीने दिलेल्या तपशीलवार वैशिष्ट्यांना अनुसरुन रिमोट टर्मिनल युनिटस- (आरटीयु)-डीसी, या विनियमांच्या अधिसूचनेनंतर सहा महिन्यांच्या आत, त्यांच्या खर्चाने स्थापन करतील; आणि एमएसएलडीसी प्रत्यक्ष वेळेच्या (रिअल टाइम) संनियंत्रणासाठी त्यांच्या स्थापनेची पडताळणी करील:

परंतु असे की, स्थापन केलेली आरटीयु-डीसी राज्य पारेषण कंपनी किंवा महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला तपासणीसाठी उपलब्ध असतील;

परंतु आणखी असे की, दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश घेणारा पारेषण मुक्त प्रवेश ग्राहक, नोडल एजन्सी आणि/किंवा महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने ठरवून दिलेल्या प्रत्यक्ष वेळेच्या (रिअल-टाइम) संदेशवहनाच्या आवश्यकतांचा खर्च देईल किंवा सहन करील.

१८. ऊर्जा हानि

१८.१ आंतर-राज्य पारेषण :

(अ) दीर्घ-कालिन प्रवेश आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेश:
केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन, प्रादेशिक विद्युत समितीने (आरपीसी) अंदाजित केलेली पारेषण यंत्रणेतील विभागित हानि विजेचा मुक्त प्रवेश खरेदीदार सहन करील.

(बा) अल्प-कालिन मुक्त प्रवेश:
केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तरतुदींना अनुसरुन, आरएलडीसी आणि एसएलडीसीने अंदाजित केलेली पारेषण यंत्रणेतील विभागित ऊर्जा हानि विजेचा मुक्त प्रवेश खरेदीदार आणि विक्रेता सहन करतील.

१८.२ राज्यांतर्गत पारेषण :

आयोगाने वेळोवेळी निश्चित केलेली मान्यताप्राप्त राज्यांतर्गत पारेषण हानि विजेच्या खरेदीदाराला सहन करील.

परंतु असे की, ऊर्जेची हिशोबपूर्ती ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील प्रमाणकानुसार हानीवर आधारित असेल.

भाग एफ : असंतुलन आणि रिॲक्टिव ऊर्जा आकार

१९. असंतुलन आकार

१९.१ व्यवहारांचे काल-परिमाण निर्धारण (शेड्युलिंग): मुक्त प्रवेश मंजूर झाल्यानंतर, आंतर-राज्य व्यवहारांचे काल-परिमाण निर्धारण (शेड्युलिंग), एक दिवस आधी (डे-अहेड) तत्वावर, भारतीय विद्युत ग्रिड संहिता (आय इ जी सी) आणि राज्यांतर्गत व्यवहारांचे राज्य ग्रिड संहितेनुसार किंवा आयोगाच्या संबंधित आदेशांनुसार करण्यात येईल.

परंतु असे की, राज्य पूलमध्ये सहभागी असलेल्या मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्रे आणि परवानाधारकांना अंतिम संतुलन आणि हिशोबपूर्ती पध्दतीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या ऊर्जा संतुलन आणि हिशोबपूर्तीच्या तरतुदी किंवा आयोगाकडून ठरवून देण्यात येईल अशी अन्य पध्दत, लागू राहील.

१९.२ मुक्त प्रवेश ग्राहकाच्या संबंधात वीज खेचणीच्या ठिकाणी ऊर्जेची हिशोबपूर्ती :
मुक्त प्रवेश ग्राहकांच्या बाबतीत विजेचे निर्धारित आणि प्रत्यक्ष केलेले अंतःक्षेपण (इंजेक्शन) आणि/किंवा खेचलेली वीज (ड्रॉअल) यामधील तफावतीची हिशोबपूर्ती वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेली पध्दत आणि आकारांनुसार करण्यात येईल.

२०. रिॲक्टीव ऊर्जा आकार

२०.१ ५ मेगावॉट किंवा अधिक भार असणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाने रिॲक्टीव ऊर्जा आकारांचा भरणा करण्याची पध्दत ही राज्य ग्रिड संहितेला आणि बहु-वर्षीय वीज दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांना किंवा संबंधित आदेशांना अनुसरुन राहील.

२०.२ ५ मेगावॅट पेक्षा कमी भार असणाऱ्या मुक्त प्रवेश ग्राहकांच्या संबंधात, आयोगाच्या संबंधित आदेशात ठरवून दिलेल्या पॉवर फॅक्टरच्या आधारे रिॲक्टीव ऊर्जा आकारांची परिगणना करण्यात येईल.

२०.३ नूतनशील ऊर्जा निर्मिती केंद्रांच्या बाबतीत, रिॲक्टिव ऊर्जा आकार हे संबंधित वीज दराच्या आदेशांत आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांनुसार राहतील.

भाग जी : वाणिज्यिक बाबी

२१. देयक तयार करणे, वसुली आणि वाटप

या विनियमांखाली देय असणाऱ्या आकारांची देयके खालील कार्यपद्धतीनुसार तयार करण्यात येतीलः

२१.१ आंतर-राज्य व्यवहार :

(एक) अल्प-कालिन मुक्त प्रवेशः-

केंद्रीय पारेषण कंपनी आणि राज्य पारेषण कंपनीच्या यंत्रणांच्या वापरासाठीचे पारेषण आकार आणि प्रादेशिक भार प्रेषण केंद्रे (आर एल डी सी) व राज्य भार प्रेषण केंद्रे यांना अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी द्यावयाच्या परिचालन (ऑपरेटिंग) आकारांची वसुली आणि वाटप, नोडल आरएलडीसी कडून, केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

(दोन) दीर्घ- कालिन प्रवेश आणि मध्यम- कालिन मुक्त प्रवेशः

- प्रादेशिक भार प्रेषण केंद्राला देय असलेल्या आकारांची देयके तयार करणे, वसुली आणि वाटप केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.
- राज्य पारेषण कंपनीकडून मुक्त प्रवेश ग्राहकाला पुढील कॅलेंडर महिन्याच्या तिसऱ्या कामाच्या दिवसापूर्वी देयक पाठविण्यात येईल.
- राज्य पारेषण कंपनीशी जोडलेला मुक्त प्रवेश ग्राहक देयक प्राप्त झाल्यावर कामाच्या पाच दिवसांच्या आत देयकाचा भरणा करील.

२१.२ राज्यांतर्गत व्यवहारः

(एक) अल्प-कालिन मुक्त प्रवेशः

अल्प-कालिन मुक्त प्रवेश अर्जदार, विनियम १४ आणि १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आकारांचा आगाऊ भरणा महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला, अल्प-

कालिन मुक्त प्रवेशाला मंजुरी मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत किंवा व्यवहार सुरु होण्यापूर्वी, जे आधी असेल त्याप्रमाणे, करील.

(दोन) दीर्घ-कालिन आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशः-
राज्य पारेषण कंपनी, विनियम १४ आणि १५ अंतर्गत त्यांना मिळणार असलेल्या आकारांसह, त्याचे देयक प्राप्त झाल्यापासून सात दिवसांच्या आत, मुक्त प्रवेश ग्राहकाला पाठवील आणि राज्य पारेषण कंपनी, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आणि संबंधित पारेषण परवानाधारकाला देय असणाऱ्या आकारांचे वितरण मासिक तत्त्वावर करील.

२२. विलंब भरणा अधिभार

जर या विनियमांखाली देय असणाऱ्या आकाराच्या कोणत्याही देयकाचा भरणा करण्यास मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाने, जसे असेल तसे, देय दिनांकानंतर विलंब केला तर, या अधिनियमाखालील किंवा अन्य विनियमांखालील कोणत्याही अन्य दायित्वास बाधा येऊ न देता, बहु-वर्षीय वीज दराचे नियमन करणाऱ्या आयोगाच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार, त्याने विलंब भरणा अधिभार देय राहील.

२३. देयक अदा न करणे

या विनियमांखालील देय असणारा कोणताही आकार किंवा रक्कम अदा न केल्यास, राज्य पारेषण कंपनी किंवा पारेषण परवानाधारक, असे आकार अधिनियमातील तरतुदींनुसार वसूल करण्याच्या त्याच्या अधिकारास बाधा न येऊ देता, मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाला, जसे असेल तसे, पंधरा दिवसांची नोटीस देऊन मुक्त प्रवेश खंडीत करु शकेल.

परंतु असे की, एमएसएलडीसीला देय असणारे आकार अदा न केले गेल्यास, एमएसएलडीसी अशा कसूरदार व्यक्ती/संस्थेला (एन्टीटी) वीज पुरवठ्याचे शेड्युल करणे नाकारु शकेल आणि अशा व्यक्ती/संस्थेची (एन्टीटी)ग्रिडला दिलेली जोडणी खंडीत करण्याचे वितरण परवानाधारकाला निर्देश देऊ शकेल.

२४. भरणा सुरक्षा पद्धत

दीर्घ-कालिन किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठीचा अर्जदार, नोडल एजन्सीच्या नावे, दोन महिन्यांत विविध आकारांसाठी देय होणाऱ्या अंदाजित रकमेसाठी, एक रद्द न करता येण्याजोगे पत-पत्र (लेटर ऑफ क्रेडिट) उघडेल.

२५. वीज अंतःक्षेपण करण्याच्या आणि वीज खेचण्याच्या ठिकाणात बदल

२५.१ दीर्घ-कालिन किंवा मध्यम-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाला, जसे असेल तसे, विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि/किंवा वीज खेचण्याची ठिकाणे बदलण्याचा पर्याय वर्षातून दोन वेळा उपलब्ध असेल. हा पर्याय अर्जदाराने केलेल्या विनंतीनुसार राज्य पारेषण कंपनीने यंत्रणेवर होणाऱ्या परिणामांच्या करावयाच्या अभ्यासाच्या निष्कर्षांना अधीन राहून असेल.

परंतु असे की, अशा बदलामुळे यंत्रणेवर होणाऱ्या परिणामांचा करावयाच्या अभ्यासावरील कोणताही खर्च किंवा राज्य पारेषण कंपनीला करावा लागणारा अतिरिक्त खर्च संबंधित ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारकाला सहन करवा लागेल.

परंतु आणखी की, मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक जर एक वर्षाहून जास्त काळ मुक्त प्रवेश घेत असेल तरच तो असा बदल करण्यास पात्र असेल.

२५.२ वीज निर्मिती किंवा निर्मितीशी संबंधित जाळे दुरुस्तीसाठी आकस्मिकपणे बंद ठेवावे लागले तर, एमएसएलडीसी अल्प-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकाला वीज अंतःक्षेपण करण्याचे ठिकाण बदलण्यास परवानगी, तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असल्यास, देऊ शकेल.

परंतु असे की, दीर्घ-कालिन प्रवेश आणि मध्यम-कालिन मुक्त प्रवेशाच्या बाबतीत, विजेचे अंतःक्षेपण करण्याच्या आणि/किंवा वीज खेचण्याच्या ठिकाणात करावयाच्या बदलासाठीचा अर्ज राज्य पारेषण कंपनीकडे कमीत कमी तीस दिवस अगोदर सादर करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, पहिला बदल अंमलात आल्यावर सहा महिन्यांनंतरच दुसरा बदल करण्यास परवानगी देण्यात येईल.

भाग एच : माहिती प्रणाली

२६. माहिती प्रणाली

एसटीयु आणि एमएसएलडीसी, या विनियमांच्या अधिसुचनेपासून तीन महिन्यांच्या आत, त्यांच्या इंटरनेटवर खालील माहिती उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवील आणि ती नियमितपणे अद्ययावत करतीलः-

(ए) अर्जाचा नमुना, अर्ज सादर करण्याची रीत आणि अर्जासोबत पाठवावयाचे शुल्क;

(बी) ठोक वीज पारेषण कराराचा नमुना व असा करार करण्याची रीत व कार्यपध्दती;

(सी) जोडणी कराराचा नमुना;

(डी) लागू असलेले पारेषण आकार आणि क्रॉस सबसिडी अधिभार; आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करण्यासाठी अन्य कोणत्याही अटी आणि शर्ती;

(इ) विद्यमान मुक्त प्रवेश ग्राहक, निर्मिती केंद्र आणि परवानाधारकाचा खालील तपशील :-

(१) ग्राहकाचे नाव

(२) मुक्त प्रवेश मंजूर केलेला कालावधी (सुरु होण्याचा दिनांक व समाप्तीचा दिनांक)

(३) मंजूर मुक्त प्रवेश क्षमतेची व्याप्ति

(एफ) मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जांची यादी, अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक, अर्ज दाखल करुन घेतल्याचा दिनांक, केलेली कार्यवाही आणि सद्यस्थिती ;

(जी) नामंजूर करण्यात आलेल्या मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जांचा कारणांसह तपशील;

(एच) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या वापराची सद्यस्थिती दाखविणारा अहवाल खालील बाबींसह असेलः-

(एक) राज्यांतर्गत पारेषण वाहिन्या, वाहिनीची क्षमता आणि नोड्स दर्शविणारेपारेषण नकाशे;

(दोन) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत पारेषण क्षमतेचे हक्क धारण करणा-या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांची नावे व अशा प्रत्येक उपयोगकर्त्याची क्षमता, कालावधी व वीज अंतःक्षेपण करण्याची व वीज खेचण्याची ठिकाणे;

(आय) राज्यांतर्गत पारेषण यंत्रणे डे-अहेड तत्वावर उपलभता तसेच मागील एक दिवस, एक महिना आणि एक वर्षासाठी च्या एक्स-पोस्ट उपलब्धतेची माहिती घोषित करणे;

(जे) मागील बावन्न आठवड्यांतील प्रत्येक आठवड्यात यंत्रणेत अंतःक्षेपित केलेल्या एकूण ऊर्जेच्या टक्केवारीत राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील ऊर्जा हानि;

(के) राज्य ग्रिड संहितेंतर्गत राज्य पारेषण कंपनीने तयार केलेला पारेषण यंत्रणा आराखडा.

भाग आय : संकीर्ण

२७. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेशाचा कमी वापर करणे किंवा वापर न करणे

२७.१ **दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश :**

दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकास, दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या पूर्ण कालावधीच्या समाप्तीपूर्वी, शिल्लक कालावधीत न वापरल्या जाऊ शकणा-या क्षमतेसाठी खालीलप्रमाणे नुकसानभरपाईची रक्कम भरुन, दीर्घ-कालिन प्रवेश हक्क पूर्णतः किंवा अंशतः सोडून देता येतील.

२७.१.१. कमीत कमी १२ वर्षासाठी प्रवेश हक्क प्राप्त केलेला दीर्घ-कालिन ग्राहक

(ए) एक वर्षाची नोटीस – जर अशा ग्राहकाने राज्य पारेषण कंपनीकडे प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित दिनांकाच्या कमीत कमी एक वर्ष अगोदर अर्ज केला असेल तर, कोणताही आकार द्यावा लागणार नाही.

(बी) एक वर्षाहून कमी कालावधीची नोटीस – जर अशा ग्राहकाने राज्य पारेषण कंपनीकडे प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित दिनांकापूर्वी एक वर्षापेक्षा कमी कालावधीत अर्ज केल्यास त्याला एक वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीतील न वापरल्या जाऊ शकणाऱ्या पारेषण क्षमतेच्या पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम अदा करावी लागेल.

२७.१.२. कमीत कमी बारा वर्षासाठी प्रवेश हक्क प्राप्त न केलेला दीर्घ-कालिन ग्राहक -

अशा ग्राहकाला बारा वर्षांचा प्रवेश हक्काचा कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीत न वापरल्या जाऊ शकणा-या पारेषण क्षमतेच्या अंदाजित पारेषण आकाराच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम (नक्त विद्यमान मूल्य) अदा करावी लागेल.

परंतु असे की, असा ग्राहक प्रवेश हक्क सोडून देण्याच्या इच्छित दिनांकाच्या कमीत कमी एक वर्ष अगोदर राज्य पारेषण कंपनीकडे अर्ज करीलः

परंतु आणखी असे की, जर ग्राहकाने दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश हक्क सोडून देण्याच्या एक वर्षापेक्षा कमी कालावधीत अर्ज केला असेल तर त्याला एक वर्षाचा नोटीस कालावधी पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीतील अंदाजित पारेषण आकारांच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम (नक्त विद्यमान मूल्य) भरावी लागेल व त्याशिवाय बारा वर्षांचा प्रवेश हक्काचा कालावधी

पूर्ण होण्यास जितका कालावधी कमी पडत असेल त्या कालावधीत न वापरल्या जाऊ शकणाऱ्या पारेषण क्षमतेच्या अंदाजित पारेषण आकारांच्या ६६ टक्क्यांइतकी रक्कम (नक्त विद्यमान मूल्य) देखील भरावी लागेल.

२७.१.३ राज्य पारेषण कंपनीने खालील गृहितकांवर निश्चित केलेला, नक्त विद्यमान मूल्याची परिगणना करण्यासाठीचा सवलत दर भांडवलाचा करोत्तर भारांकित सरासरी खर्च असेल.

ए) कर्जःभागभांडवल गुणोत्तर ७०:३०

बी) भागभांडवलावरील करोत्तर परताव्याचा १६ टक्के

सी) व्याज दर स्टेट बँक ऑफ इंडिया अग्रिम दर (एसबीएआर) म्हणून परिगणना केलेला व्याज दर + ३ टक्के, जर एसबीएआर संबंधित आर्थिक वर्षाच्या पहिल्या दिवशीचा असेल तर.

२७.१.४ दीर्घ-कालिन ग्राहकांनी न वापरल्या जाऊ शकणाऱ्या पारेषण क्षमतेसाठी भरलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेचा उपयोग, ज्या आर्थिक वर्षात अशी नुकसानभरपाई देय असेल त्या आर्थिक वर्षात अन्य दीर्घ-कालिन ग्राहक आणि मध्यम-कालिन ग्राहकांनी देय असलेले पारेषण आकार कमी करण्यासाठी, अशा ग्राहकांकडून त्या वर्षात देय असलेल्या पारेषण आकारांच्या प्रमाणात, करण्यात येईल.

२७.२ **मध्यम-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक**

मध्यम-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक नोडल एजन्सीला कमीत कमी ३० दिवसांची आगाऊ सूचना देऊन मुक्त प्रवेश हक्क पुर्णतः किंवा अंशतः सोडून देऊ शकेल.

परंतु असे की, असा ग्राहक त्याचे मुक्त प्रवेश हक्क सोडून देताना, ते सोडून देत असलेल्या कालावधीसाठी किंवा तीस दिवस, यापैकी जे कमी असेल त्या कालावधीसाठी, लागू असलेल्या पारेषण आकारांचा भरणा करेल.

२७.३ **अल्प-कालिन मुक्त प्रवेश ग्राहक**

(ए) अल्प-कालिन मुक्त प्रवेश ग्राहकाने केलेल्या अर्जातील विनंतीनुसार, नोडल एजन्सीने अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी आगाऊ किंवा प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर मंजूर केलेले शेड्युल रद्द किंवा निम्नगामी दिशेने सुधारित करता येईल.

परंतु असे की, रद्द केलेले किंवा निम्नगामी दिशेने सुधारित केलेले शेड्युल किमान दोन दिवसांचा कालावधी समाप्त होण्यपूर्वी, अंमलात येणार नाही.

परंतु आणखी असे की, ज्या दिवशी नोडल एजन्सीला शेड्युल रद्द किंवा निम्नगामी दिशेने सुधारित करण्याची सूचना देण्यात आली असेल तो दिवस आणि अशा सूचनेची अंमलबजावणी करावयाची असेल तो दिवस, दोन दिवसांच्या कालावधीची गणना करताना त्यात धरले जाणार नाहीत.

(बी) ज्या कालावधीकरिता अल्प-कालिन मुक्त प्रवेशाचे शेड्युल रद्द किंवा निम्नगामी दिशेने सुधारीत करण्यासाठी, जसे असेल तसे, ज्या व्यक्तीने विनंती केली असेल ती व्यक्ती, रद्द किंवा निम्नगामी दिशेने सुधारीत करण्याच्या कालावधीच्या पहिल्या दोन दिवसांकरिता, सुरुवातीला मंजुरी दिलेल्या मुक्त प्रवेशाला अनुसरुन आणि त्यानंतर, अशा रद्द करण्याच्या किंवा सुधारीत करण्याच्या कालावधीत, नोडल एजन्सीने तयार केलेल्या सुधारीत मुक्त प्रवेशाला अनुसरुन, पारेषण आकार अदा करील.

(सी) शेड्युल रद्द करण्यात आले असल्यास विनियम १५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले परिचालन आकार दोन दिवसांकरिता किंवा रद्द केलेल्या कालावधीच्या दिवसांकरिता, यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे, देय राहतील.

२८. मुक्त प्रवेशासाठी क्षमता उपलब्धतेची परिगणना

२८.१ राज्य पारेषण कंपनीकडून प्रत्येक पारेषण घटक आणि प्रत्येक उप-केंद्रासाठी मुक्त प्रवेशाकरिता उपलब्ध क्षमतेची परिगणना खाली नमूद केलेल्या पध्दतीप्रमाणे करण्यात येईलः

२८.१.१ पारेषण यंत्रणा घटकाची उपलब्ध मुक्त प्रवेश क्षमता = (डीसी – (एसडी + एसी +आरएम)) + एनसी

जेथे,

डीसी = पारेषण घटकाची डिझाइन क्षमता,

एसडी = घटकामध्ये नोंद झालेली सातत्याने असलेली मागणी,

आरएम = विश्वासार्हतेचे मार्जिन

एसी = यापूर्वीच वाटप करण्यात आलेली परंतु प्राप्त न करुन घेतलेली क्षमता; आणि

एनसी = भर घालावयाची मेगावॉटमधील अपेक्षित नवीन क्षमता.

(सर्व मेगावॅटमध्ये)

२८.१.२ उप-केंद्राची उपलब्ध मुक्त प्रवेश क्षमता = (टीसी – (एसपी + एसी)) + एनसी

जेथे,

टीसी = उप-केंद्राची रोहित्र क्षमता,

एसपी = उप-केंद्राची सर्वोच्च मागणी,

एसी = यापूर्वीच वाटप करण्यात आलेली परंतु प्राप्त न करुन घेतलेली क्षमता आणि

एनसी = भर घालावयाची अपेक्षित नवीन रोहित्र क्षमता. (सर्व एमव्हीएमध्ये)

२८.१.३ राज्य पारेषण कंपनी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी वरील मूल्ये मासिक तत्वावर अद्ययावत करील आणि त्यांच्या संकेत-स्थळावर प्रदर्शित करील.

२९. मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य

राज्य ग्रिडच्या कामकाजात तांत्रिक मर्यादा आल्यास, ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक यांचा मुक्त प्रवेश कमी करणे आवश्यक झाले तर, राज्य ग्रिड संहितेच्या तरतुदींच्या अधीन राहून, एमएसएलडीसी खालील क्रमानुसार मुक्त प्रवेश कमी करीलः.

मुक्त प्रवेश कमी करण्याचा क्रम	व्यवहाराचा प्रकार
प्रथम	अल्प -कालिन मुक्त प्रवेश
दुसरा	मध्यम-कालिन मुक्त प्रवेश
तिसरा	दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश
शेवटी	वितरण परवानाधारकाचा अल्प-कालिन, मध्यम-कालिन किंवा दीर्घ-कलिन मुक्त प्रवेश, या क्रमाने.

परंतु असे की, अल्प-कालिन मुक्त व्यवहारांमधील द्वि-पक्षीय व्यवहार आणि सामुदायिक व्यवहार यांच्यामध्ये मुक्त प्रवेश कमी करण्याचा क्रम केंद्रीय आयोगाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राहील.

३०. वाद

येथे अन्य तरतूद करण्यात आली असल्यास ती वगळून, या विनियमांतर्गत कोणताही वाद उद्भवल्यास त्यावर आयोगाकडून अभिनिर्णय देण्यात येईल.

३१. दैवी आपत्ती

या विनियमांत काहीही नमूद करण्यात आले असले तरी त्याचा अर्थ, दैवी आपत्तीच्या घटना घडल्यामुळे नोडल एजन्सी जर वीज जोडणीयता मंजूर करु किंवा मुक्त प्रवेशास संमती देऊ शकत नसेल तरी त्याने ते करावे, असा घेण्यात येणार नाही. दैवी आपत्तीच्या घटना खालीलप्रमाणे असतील:-

(ए) नैसर्गिक आपत्ती जी पूर, वादळ, दुष्काळ, भूकंप आणि साथीचे रोग यासह परंतु त्यापुरतीच मर्यादित नसेल;

(बी) युद्ध (घोषित किंवा अघोषित), बंड, आक्रमण, सशस्त्र संघर्ष किंवा परकीय शत्रुच्या कारवाया यापैकी कोणतीही घटना जी भारताशी संबंधित किंवा भारतावर थेट परिणाम करणारी असेल, तसेच क्रांती, दंगल, उठाव, किंवा अन्य नागरी असंतोष, दहशतवादी किंवा घातपाताच्या कृत्ये, यापैकी भारतामधील प्रत्येक घटना;

(सी) निर्मिती केंद्र, स्व-वापरासाठीचे निर्मिती प्रकल्प किंवा ग्राहक, आंतर-राज्य पारेषण यंत्रणा किंवा राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा किंवा अन्य कोणतीही यंत्रणा किंवा सुविधा, जी करारांतर्गत जबाबदा-या पार पाडण्यासाठी करावयाच्या कृतीचा एक अविभाज्य आणि महत्त्वाचा भाग असेल, यांच्यावर थेट परिणाम करणारे अणु-स्फोट, किरणोत्सर्गी अथवा रासायनिक प्रदुषण किंवा आयोनायझिंग किरणोत्सर्जन;

(डी) वर उल्लेखलेल्या कोणत्याही घटनेशी साम्य असणारी भारतात घडणारी कोणतीही घटना किंवा परिस्थिती.

परंतु असे की, अशी दैवी अपत्तीची घटना घडल्यापासून १५ दिवसाच्या आत ती घडल्याचे कोणताही पक्षकार, दुसऱ्या पक्षकाराला अशा घटनेबाबत कळवील.

३२. दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोग या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल किंवा सुधारण कोणत्याही वेळी करु शकेल.

३३. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, आयोग, सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, एसटीयु, एमएसएलडीसी,

राज्यांतर्गत परवानाधारक किंवा मुक्त प्रवेश ग्राहक यांना अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आयोगास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कार्यवाही करण्याचे निर्देश देऊ शकेल.

३४. आदेश व कार्यप्रणाली निर्देश

अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, या विनियमांच्या अमंलबजावणी संबधात आयोग आदेश व कार्यप्रणाली निर्देश देऊ शकेल.

३५. रद्द करणे आणि अपवाद

३५.१ या विनियमांमध्ये अन्यथा नमूद केलेल्या बाबी वगळून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१४ या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून रद्द होतील.

३५.२ हे विनियम रद्द करण्यात आले असले तरी, या रद्द केलेल्या विनियमांतर्गत करण्यात आलेली किंवा केली आहे असे अभिप्रेत असणारी कोणतीही कार्यवाही ही या विनियमांखाली करण्यात आलेली किंवा केली आहे असे अभिप्रेत असल्याचे मानण्यात येईल.

३५.३ हे विनियम अमलात येण्याच्या दिनांका रोजी प्रचलित असलेल्या करार किंवा संविदेखाली महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश घेतलेल्या ग्राहक, निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, जसे असेल तसे, अशा प्रचलित असलेल्या करार/ संविदेअंतर्गत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या त्याच अटी व शर्तींना अनुसरुन, पारेषण यंत्रणेत असा प्रवेश पुढे चालू ठेवण्याचा हक्क राहील.

परंतु असे की, आयोगाच्या वितरण मुक्त प्रवेशाचे नियमन करणाऱ्या विनियमांतील विजेचे बँकींग, देयक मागणीची व्याख्या, विजेचे अंतःक्षेपण (इंजेक्शन) आणि वीज खेचण्याच्या (ड्रॉअल) ठिकाणांतील बदल आणि करारांतर्गत मागणीत सुधारणा, या संबंधातील तरतुदी प्रचलित असलेल्या पारेषण मुक्त प्रवेश करार किंवा संविदांना देखील लागू राहतील.

परंतु आणखी असे की, ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक ज्याने रद्द करण्यात आलेल्या विनियमांतर्गत महाराष्ट्रातील पारेषण यंत्रणेत मुक्त प्रवेश मागण्यासाठी अर्ज केलेला असेल आणि ज्याच्या अर्जाची हे विनियम अंमलात येण्याच्या दिनांका रोजी छाननी चालू असेल त्याने पुन्हा अर्ज करण्याची गरज नाही आणि अशा अर्जाची छाननी या विनियमांच्या तरतुदींतर्गत करण्यात येईल.

३५.४ या विनियमांत काहीही नमूद केले असले तरी त्यामूळे, स्पष्टपणे किंवा सूचितपणे, ज्यासाठी कोणतेही विनियम करण्यात आलेले नाहीत, असे कोणतेही प्रकरण हाताळण्यास किंवा अधिनियमातील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यास, आयोगाला बाधा येणार नाही.

अश्वनी कुमार
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांकः ३० मार्च, २०१६.

परिशिष्ट – १

जोडणीयतेसाठी अर्जाचा नमुना

प्रति,
राज्य पारेषण कंपनी
पत्ता

विषय ः पारेषण यंत्रणेशी जोडणीयता

मला/आम्हाला , ----------

(अर्जदाराचे नाव) , विद्युत अधिनियम, २००३ आणि लागू असलेल्या विनियमांनुसार राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमध्ये जोडणीयता हवी आहे.

त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे ः

१. अर्जदाराची सद्यस्थिती ः निर्मिती केंद्र / परवानाधारक

२. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेशी जोडणी हवी असलेल्या परवानाधारकाचा तपशील ः

ए) अर्जदाराचे नाव

बी) जोडणी देण्यात यावयाच्या जागेचा पत्ता

सी) वीज वापराचा उद्देश

डी) वीज देऊ इच्छिणारी वीज निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक यांच्याकडे अर्जात मागितलेला भार, कमाल भार व सरासरी भार यासहः

३. निर्मिती कंपनीशी जोडणीचा तपशील ः

ए) विद्युत संयत्राचे नाव

बी) पत्ता

सी) प्रवर्तक

डी) क्षमता

इ) ज्या दिनांकापासून जोडणीयता हवी आहे तो दिनांक

एफ) तंत्रज्ञान

जी) वीज निर्मितीचे व्होल्टेज

एच) स्टेप-अप व्होल्टेज

आय) सुरु करण्याचे वेळापत्रक (संच निहाय)

जे) स्थापित क्षमता (संच निहाय)

४. जोडणीयता अर्जासाठी प्रदानांचा तपशील

ए) रक्कम

बी) व्यवहार संदर्भ क्रमांक

सी) दिनांक

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी

सध्याचा पत्ता

जोडपत्र : अर्जासोबत जोडलेला तपशील/दस्तावेज

परिशिष्ट – २ - अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने

अल्प-कालिन मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी अर्ज (अल्प-कालिन मुक्त प्रवेश अर्जदाराने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करावयाचा अर्ज)						
१	अर्जदाराचा अर्ज क्र.:		दिनांकः			
२	अर्जदाराचे नाव		प्रकारः नवीन/ नूतनीकरण			
३	ग्राहक क्र.:		विद्यमान पुरवठादार (असल्यास):			
४	मीटर क्र.					
५	पत्रव्यवहाराचा पत्ता :					
	संपर्क क्रः			(फॅक्स):		
	ई-मेल आयडीः			मोबाइल क्र.		
६	अर्जदाराचा प्रकारः *<विक्रेता/खरेदीदार/व्यापारी/स्व-वापरासाठीचे वीज निर्मिती केंद्र/नूतनशील ऊर्जा निर्मिती केंद्र>*					
७	समन्वयकाचा तपशील					
	नाव आणि पदनामः					
	संपर्क क्रः		(फॅक्स)			
		ई-मेल आयडीः	मोबाईल			
८	मुक्त प्रवेश परिमाणाचा तपशील					
	कालावधी (दिवसात)		कालावधी (वेळेत)			क्षमता (मेगावॅट)
	(दिनांक)पासून	(दिनांक) पर्यंत	तास (पासून)	तास (पर्यंत)		
	<आवश्यकता असल्यास ओळी वाढविणे>					
९	पीपीए / एमओयु चा तपशील		पीपीए/एमओयुचा दिनांक	वैधता कालावधी		क्षमता
	पक्षकारांचे नाव आणि पत्ता			प्रारंभ	समाप्ती	(मेगावॅट)
	विक्रेता	खरेदीदार				
१०	विजेचे अंतःक्षेपण करणाऱ्या कंपनीचा तपशील <प्रत्येक अंतःक्षेपण ठिकाणासाठी पुन्हा					

	भरणे >	
	नावः	
	विजेचे अंतःक्षेपण करण्याचे ठिकाणः	
	व्होल्टेजची पातळी :	
	संबंधित वितरण परवानाधारकाचे नावः	
	तपशील (सर्वात जवळच्या उप-केंद्राकडे जाण्याचा मार्ग):	
	मीटर क्रः	
११	वीज खेचणाऱ्या कंपनीचा तपशील	
	नावः	
	वीज खेचण्याचे ठिकाणः	
	व्होल्टेजची पातळी :	
	संबंधित वितरण परवानाधारकाचे नाव :	
	तपशील (सर्वात जवळच्या उप-केंद्राकडे जाण्याचा मार्ग):	
	मीटर क्र.:	
१२	परवानाधारक वीज व्यापाऱ्याचे नाव, असल्यास;	
१३	परवानाधारक वीज व्यापाऱ्याचा क्रमांक, लागू असल्यास	
१४	अर्जाची फी भरणा केल्याचा तपशीलः	

(टीप-स्वतःसाठी वीज वापर असल्यास, भांडवल रचनेचा तपशील आणि विद्युत अधिनियम, २००३ सह विद्युत नियम, २००५ मधील आवश्यकतांची पूर्तता केली असल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देण्यात यावे)

स्वाक्षरी -

ठिकाणः नाव आणि पदनाम

दिनांकः

जोडपत्रे :

(एक) ---------- द्वारे विना-परताव्याचे अर्ज शुल्क

(दोन) करारातील विजेची मागणी, व्यवहाराचा कालावधी, विजेचे अंतःक्षेपण करण्याची आणि वीज खेचण्याची ठिकाणे, इ. बाबी नमूद करण्यात आलेल्या व्यवहाराशी संबंधित

पक्षकारांमध्ये (खरेदीदार आणि विक्रेते) करण्यात आलेल्या पीपीए/सामंजस्य कराराची (एमओयु) स्व-प्रमाणित प्रत

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या वापरासाठी (अर्जदाराने सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात)	
महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा संदर्भ क्र.:	दिनांक :
महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राची मंजुरी/नकाराचा क्र.	
शेरे (नकाराची कारणे नमूद करावीत)	

(महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र नकाराच्या कारणाच्या पुष्ट्यर्थ प्रत्येक पानावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली कागदपत्रे देखील सोबत जोडेल)

परिशिष्ट – २

अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने

पोच-पावती

(फक्त कार्यालयीन वापरासाठी)

अल्प-कालिन मुक्त प्रवेश मंजुरीसाठी अर्ज

अ) < अर्जदाराने भरावयाची माहिती >

१	**अर्जदाराचा अर्ज क्रमांक**		दिनांक	
२	**मुक्त प्रवेश व्यवहाराचा दिनांक**	पासून (दिवस/महिना/वर्ष) ते (दिवस/महिना/वर्ष)		
३	**अर्जदाराचा प्रकार** *विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ वीज व्यापारी परवानाधारक*			

४	**अर्जदाराचे नाव**			
५	**नोंदणी संकेतांक***		**पर्यंत वैध**	

< * महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >

ब) < महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने भरावयाची माहिती >

अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक व वेळ	

ठिकाण: स्वाक्षरी (शिक्क्यासह)

दिनांक: (नाव आणि पदनाम)

वि. सू.: याची प्रति-पावती अर्जदाराला देण्यात येईल.

परिशिष्ट – २

अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने
नमुना - अ.का.२

अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी मंजुरी
(महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने द्यावयाची)

	महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा मंजुरी क्र.		दिनांक	
	मंजूर आवृत्ती	मूळ/सुधारणा-१/सुधारणा-२/...		

१	अर्जदाराचा अर्ज क्रमांक		अर्जाचा दिनांक	
२	अर्ज क्र. < नोडल एजन्सीकडून देण्यात आलेला आवक क्र.>			
३	अर्जदाराचा प्रकार*			

** विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ वीज व्यापारी परवानाधारक (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)*

४	अर्जदाराचे नाव			
५	नोंदणी संकेतांक		पर्यंत वैध	

<** महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >

६	ग्रिडशी व्यवहार करणाऱ्या पारेषण कंपनीचा तपशील		
		वीज अंतःक्षेपित करणारी कंपनी	वीज खेचणारी कंपनी
	विद्युत कंपनीचे नाव		
	विद्युत कंपनीचा दर्जा *		
	ज्या कंपनीत ती समाविष्ट आहेत ती विद्युत कंपनी		

<*मालकीच्या संदर्भात- राज्य कंपनी/स्व-वापरासाठीचा वीज निर्माता/स्वतंत्र वीज निर्माता/आंतर-राज्य वीज निर्मिती केंद्रे (आयएसजीएस)/ वितरण परवानाधारक/ग्राहक/अन्य कोणी असल्यास, विनिर्दिष्ट करणे >

७	राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा/ वितरण यंत्रणेशी (लाग असेल त्याप्रमाणे) वीज अंतःक्षेपण/खेचणा-या जोडणीयतेचा अतिरिक्त तपशील			
			वीज अंतःक्षेपित करणारी कंपनी	वीज खेचणारी कंपनी
	उप-केंद्राचे नाव	पारेषण		
		वितरण		
	व्होल्टेजची पातळी	पारेषण		
		वितरण		
	परवानाधारकाचे नाव (उप-केंद्राचा मालक)			
	मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक			
	मध्यस्थ आंतर-राज्य परवानाधारक			

< वितरण परवानाधारक, आवश्यकता असल्यास, इंटरफेस सीमा त्याच्या जोडणीयतेचे ठिकाण मानू शकेल >

८	मुक्त प्रवेश मंजूर केलेला कालावधी (दि.---------- पासून ते दि.---------- पर्यंत)							
	महिना	दिनांक		तास		क्षमता (मेगावॅटमध्ये)		मेगावॅट तास
		पासून	पर्यंत	पासून	पर्यंत	अर्जात मागितलेली	वाटप केलेली	
						एकूण मेगावॅट तास		

९	बोलीचा तपशील <*फक्त बोली असल्यास* >					
	राज्यांतर्गत यंत्रणेचा तपशील	दिनांक		तास		लागू असलेला दर (रु./युनिट)
		पासून	पर्यंत	पासून	पर्यंत	
	पारेषण यंत्रणा					
	वितरण यंत्रणा					

१० वेळोवेळी सुधारणा केलेल्या आणि लागू असलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि अशा अन्य कोणत्याही संबंधित विनियम/आदेश/संहितेमधील तरतुदींच्या अधीन सदर मंजुरी राहील < फक्त प्रकरण मंजूर केले असल्यास>

११ ---------- मुळे प्रकरण नामंजूर करण्यात येत आहे.

< फक्त प्रकरण नामंजूर केले असल्यास >

< महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र मुक्त प्रवेश नामंजूर करण्यात आला असल्यास विशिष्ट कारण कळवेल आणि त्याच्या पुष्ट्यर्थ असलेली प्रत्येक पानावर स्वाक्षरी केलेली कागदपत्रे सोबत जोडू फ़्दशकेल>

ठिकाण: स्वाक्षरी (शिक्क्यासह)

दिनांक: (नाव आणि पदनाम)

<u>जोडपत्रे:</u>

१) रकमा भरणा करण्याचे वेळापत्रक *< फक्त प्रकरण मंजूर केले असल्यास>*

२) अन्य, काही असल्यास

<u>जोडपत्रांसह प्रत रवाना</u>

१) ग्राहक

२) व्यवहाराशी संबंधित पारेषण उप-केंद्राचा प्रभारी अधिकारी

३) व्यवहाराशी संबंधित वितरण उप-केंद्राचा प्रभारी अधिकारी

४) संबंधित अन्य कोणीही

परिशिष्ट – २

अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने
नमुना - अ.का. २ चे जोडपत्र

रकमा भरणा करण्याचे वेळापत्रक

(महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने दर महिन्यास नमुना - अ.का. २ बरोबर जोडावयाचे)

	महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा मंजुरी क्र.		दिनांक	
	मूळ आवृत्ती	मूळ/सुधारणा-१/सुधारणा-२/...		

१	अर्जदाराचा अर्ज क्रमांक		अर्जाचा दिनांक	
२	अर्ज क्र. < नोडल एजन्सीकडून देण्यात आलेला आवक क्र.>		दिनांक	
३	अर्जदाराचा प्रकार*			

** विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ वीज व्यापारी परवानाधारक (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)*

४	ग्राहकाचे नाव			
५	नोंदणी संकेतांक **		पर्यंत वैध	

<** महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >

६	अल्प-कालिन तात्पुरत्या* मुक्त प्रवेश आकारांचा मासिक भरणा करावयाचे वेळपत्रक (मुक्त प्रवेशाचा कालावधी: *दि.* *पासून दि.* *पर्यंत*)			महिना
	खालील बाबींसाठी आकारणीयोग्य रक्कम	दर (रु./युनिट)	युनिट	एकूण (रु.)
	१) राज्यांतर्गत जाळे			
	अ) पारेषण आकार			
	संबंधित पारेषण परवानाधारक			

	मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक (असल्यास)			
	ब) वहन आकार			
	संबंधित वितरण परवानाधारक			
	मध्यस्थ राज्यांतर्गत परवानाधारक (असल्यास)			
	क) अधिभार			
	संबंधित वितरण परवानाधारक			
	ड) अतिरिक्त अधिभार			
	संबंधित वितरण परवानाधारक			
	इ)महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आकार			
	महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र			
	२) आंतर-राज्य जाळे			
	पारेषण आकार			
	मध्यस्थ आंतर-राज्य परवानाधारक (असल्यास)			
	भरणा करावयाची एकूण मासिक रक्कम (रु.)			

ठिकाण: स्वाक्षरी (शिक्क्यासह)

दिनांक: (नाव आणि पदनाम)

* तात्पुरती रक्कम ही अर्जात उल्लेख केलेल्या रु./युनिट च्या आधारे असेल, जी प्रत्यक्ष वापरानुसार बदलू शकेल.

परिशिष्ट – २

अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने
नमुना - अ.का. ३

(विद्युत) अतिभाराची माहिती आणि बोलीसाठी आमंत्रण

(महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने पाठवावयाचे आमंत्रण)

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा बोली आमंत्रण क्र. --------- दिनांक ------

१	अर्जदाराचा अर्ज क्रमांक		अर्जाचा दिनांक	
२	अर्ज क्र. < नोडल एजन्सीकडून देण्यात आलेला >			
३	अर्जदाराचा प्रकार*			

विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता / वीज व्यापारी परवानाधारक (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)

४	अर्जदाराचे नाव			
५	नोंदणी संकेतांक		पर्यंत वैध	

< महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >**

६	मुक्त प्रवेश व्यवहाराचा दिनांक	पासून ---------- (दिवस/महिना/वर्ष) पर्यंत ---------- (दिवस/महिना/वर्ष)

७. अपेक्षित अतिभार (रोहित्र आणि विद्युत वाहिनी/लिंक) खालीलप्रमाणे आहे:

नेटवर्क कॉरिडॉर		अतिभाराचा कालावधी				उपलब्ध मार्जिन / क्षमता	सर्व ग्राहकांनी अर्जात मागणी केलेली एकूण क्षमता
उप-केंद्र रोहित्राच्या क्षमतेसह	विद्युत वाहिनी/ लिंक क्षमतेसह	दिनांक		तास			
		पासून	पर्यंत	पासून	पर्यंत	मेगावॅट	मेगावॅट

राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा							
राज्यांतर्गत वितरण यंत्रणा							
आंतर-राज्य पारेषण यंत्रणा							

८. उपरोल्लेखित बाबी विचारात घेऊन कृपया नमुना- अ.का. ४ मध्ये बोली सादर करावी. बोलीचा तपशील खालीलप्रमाण आहेः-

अ) बोलीच्या आमंत्रणाचा दिनांक		वेळ	
ब) बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक		वेळ	
क) बोली उघडण्याचा दिनांक		वेळ	
ड) बोली कशासाठी मागविण्यैंत आली आहे			

राज्यांतर्गत नेटवर्क कॉरिडॉर		अतिभाराचा कालावधी				बोलीसाठी उपलब्ध मार्जिन / क्षमता	किमान किंमत
उप-केंद्र	विद्युत वाहिनी/ लिंक	दिनांक		तास			
		पासून	पयैत	पासून	पयैत	मेगावॅट	रुपये/युनिट
पारेषण यंत्रणेचे नाव							
वितरण यंत्रणेचे नाव							

९. जर बोली सादर करण्यात आली नाही तर, अर्ज मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही.

ठिकाणः स्वाक्षरी (शिक्क्यासह)

दिनांकः नाव आणि पदनाम

परिशिष्ट – २

अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने

नमुना - अ.का. ४

बोलीसाठी प्रस्ताव

(ग्राहकाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला सादर करावयाचा)

संदर्भः महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचा बोली आमंत्रण क्र. ---------- दिनांक --------

प्रतिः महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र,

१	अर्जदाराचा अर्ज क्रमांक		अर्जाचा दिनांक	
२	अर्ज क्र. < नोडल एजन्सीकडून देण्यात आलेला आवक क्र.)			
३	अर्जदाराचा प्रकार*			

< ** विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासाठीच्या विजेचा उपयोगकर्ता/ विजेचा व्यापारी (विक्रेता/खरेदीदार/स्व-वापरासठीच्या विजेचा उपयोगकर्ता यांच्या वतीने)*

४	ग्राहकाचे नाव			
५	नोंदणी संकेतांक **		पर्यंत वैध	

<** महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राकडून देण्यात आल्याप्रमाणे नोंदणी संकेतांक असेल >

६	मुक्त प्रवेश व्यवहाराचा दिनांक	पासून ---------- (दिवस/महिना/वर्ष) पर्यंत ---------- (दिवस/महिना/वर्ष)

७. वरील बोली आमंत्रणाच्या संदर्भात, मी माझी बोली खालीलप्रमाणे सादर करीत आहे-

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने दिलेला बोलीचा तपशील								
राज्यांतर्गत नेटवर्क कॉरिडॉर		अतिभाराचा कालावधी				बोलीसाठी उपलब्ध मार्जिन / क्षमता	किमान किंमत	बोलीदाराने नमूद (क्वोट) करावयाची बोली किंमत
उप-केंद्र	विद्युत वाहिनी / लिंक	दिनांक		तास				
		पासून	पर्यंत	पासून	पर्यंत	मेगावॅट	पैसे/युनिट	पैसे/युनिट*
पारेषण यंत्रणेचे नाव								
वितरण यंत्रणेचे नाव								

< * बोलीदार किमान किंमतीच्या संदर्भात त्यांची किंमत (पूर्णांक संख्येत) नमूद करतील.>

८. मी याद्वारे मान्य करतो की, निश्चित केलेली बोलीची किंमत पारेषण आकार असतील.

ठिकाणः स्वाक्षरी (शिक्क्यासह)

दिनांकः (नाव आणि पदनाम)

परिशिष्ट – ३

दीर्घ-कालिन/मध्यम कालिन मुक्त प्रवेशासाठी अर्ज

(मुक्त प्रवेश अर्जदाराने सादर करावयाचा)

अर्जदाराचा अर्ज क्र.: **दिनांक:----------**

१ अर्जदाराचे नाव :

२ पत्रव्यवहाराचा पत्ता :

दूरध्वनी क्र. < > फॅक्स क्र. < > ई-मेल < >

३ अर्जदाराचा प्रकारः (खरेदीदार/विक्रेता/वीज व्यापारी परवानाधारक/स्व-वापरासाठीचा वीज निर्मिती केंद्र)

४ करार/एमओयु/संमती पत्राचा तपशीलः-

सह	संदर्भ क्र.	दिनांक	पर्यंत वैध	कमाल मागणी (मेगावॅट)
खरेदीदार				
विक्रेता				

५ समन्वयकाचा तपशील :-

नाव		
पदनाम		
दूरध्वनी क्रमांक	(कार्या.) :	(निवास)
	(फॅक्स) :	(मोबाईल)
	ई-मेल आयडीः	

६ मुक्त प्रवेशाचा प्रकारः (स्व-वापरासाठीचा वीज निर्माता किंवा अन्य पक्षकार)

(स्वतःसाठी वीज वापर असल्यास, भांडवल रचनेचा तपशील आणि आणि विद्युत अधिनियम, २००३ सह विद्युत नियम, २००५ मधील आवश्यकतांची पूर्तता केली अस्सल्याबाबत सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र देण्यात यावे)

७ वीज हस्तांतरण गरजेचा तपशील

१ पारेषण करावयाच्या विजेचे परिमाण (मेगावॅट)
२ हस्तांतरीत करावयाचा सर्वोच्च भार (मेगावॅट)
३ हस्तांतरीत करावयाचा सरासरी भार (मेगावॅट)

८ मुक्त प्रवेश सुरु होण्याचा अपेक्षित दिनांकः

९ मुक्त प्रवेश हवा असलेला कालावधीः

कालावधी		वेळ		क्षमता (मेगावॅट)
दिनांकापासून	दिनांकापर्यंत	तासापासून	तासापर्यंत	

१० अंतःक्षेपणाच्या ठिकाणाचा तपशीलः (प्रत्येक अंतःक्षेपण ठिकाणासाठी पुन्हा देणे)

वीज अंतःक्षेपण करणाऱ्या विद्युत कंपनी/व्यक्ती किंवा संस्था/ पक्षकार /वीज निर्मिती केंद्राचे नांव		
प्रकार आणि निर्मिती क्षमता		
व्होल्टेज पातळी		
वीज अंतःक्षेपणाचे ठिकाण (उप-केंद्राचे नाव – वितरण परवानाधारक)		
ज्याच्या क्षेत्रात स्थित असेल त्या ठिकाणाचे आणि वितरण परवानाधारकाचे नाव		
मीटरींग व्यवस्था मीटरचा तपशील		
अ.	अचूकतेचा दर्जा	

ब.	दिवसातील (दोन) वेळांमधील मध्यावधी (टाईम ऑफ डे इंटरव्हल)	
क.	मापदंड	
एक		
दोन		
तीन		
चार		

११. वीज खेचण्याच्या ठिकाणाचा तपशील (वीज खेचणाऱ्या कंपनी/ग्राहकाचा तपशील):

उपयोगकर्त्याचे नाव		
बहिर्गमनाचे ठिकाण		
व्होल्टेजची पातळी		
बहिर्गमनाच्या ठिकाणासाठी वीज पुरवठ्याचा स्रोत (उप-केंद्र-वितरण परवानाधारकाचे नाव)		
ज्याच्या क्षेत्रात स्थित असेल त्या ठिकाणाचे आणि वितरण परवानाधारकाचे नाव		
मीटरींग व्यवस्था मीटरचा तपशील		
अ.	अचूकतेचा दर्जा	
ब.	दिवसातील (दोन) वेळांमधील मध्यावधी- (टी डी इंटरव्हल)	
क.	मापदंड	
एक.		
दोन.		
तीन.		
चार.		

१२. बहिर्गमनाच्या ठिकाणाचा ग्राहक वितरण परवानाधारकाचा विद्यमान ग्राहक आहे का? (होय किंवा नाही)

(उत्तर होय असल्यास, ग्राहक क्रमांक, करार केलेली कमाल मागणी, वर्गवारी, मुक्त प्रवेश अंशतः भारासाठी किंवा पूर्ण भारासाठी आहे, याची माहिती देणे)

१३. वीज खरेदीचा करार (पीपीए)/ कंत्राट आणि सामंजस्य करार (एम ओ यु) चा तपशील

एक. अंतःक्षेपण करण्यासाठी लागणाऱ्या विजेकरिता
दोन. खेचण्यासाठी लागणाऱ्या विजेकरिता
तीन. संतुलन आणि तफावतीसाठी लागणाऱ्या विजेकरिता
चार. आंतर-राज्य पारेषण मुक्त प्रवेशासाठी, असल्यास
पाच. वरील व्यवहारात वीज व्यापाऱ्याशी आणि विद्युत एक्स्चेंजच्या सदस्यांशी, केला असल्यास, कोणताही करार

१४. निर्मिती केंद्रांच्या बाबतीत

एक. प्रवर्तकाचे नाव :
दोन. निर्मिती क्षमता
तीन. निर्मिती संयंत्राचे ठिकाण
चार. संचांची संख्या आणि प्रत्येक संचाची क्षमता
पाच. इंधनाचा प्रकार
सहा. बेस भार केंद्र किंवा पीकींग भार केंद्र
ए) पीकींग भार असल्यास, अंदाजित प्रवाहाचे तास
बी) जल विद्युत निर्मिती प्रकल्प असल्यास, तो नदीच्या वाहत्या पाण्यावर/ साठवलेल्या पाण्यावर (रिझव्हायर)/बहुउद्देशीय/पम्प स्टोअरेज वर आहे का,
सी) जल विद्युत निर्मिती प्रकल्पाच्या बाबतीत एक वर्षातील निर्मिती- (दशलक्ष युनिट्समध्ये)
सात. स्टेप-अप जनरेशन व्होल्टेज ४०० केव्ही किंवा २२० केव्ही किंवा अन्य कोणताही व्होल्टेज तो विनिर्दिष्ट करा
आठ. जल विद्युत केंद्राच्या बाबतीत तो, केंद्रीय विद्युत प्राधिकारणाने निश्चित केलेला प्रकल्प आहे का

१५ अर्जाच्या शुल्काचा तपशील (विना-परतावा):

एक	बँकेचे नाव	
दोन	ड्राफ्ट क्र. आणि दिनांक	
तीन	रक्कम	
चार	ड्राफ्ट कोणत्या बॅकेत देय असेल	

१६ अन्य कोणतीही माहितीः

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की,

१. वेळोवेळी सुधारणा करण्यात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश), विनियम २०१६ आणि/किंवा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम २०१६ मधील, जसे असेल तसे, तरतुदींचे पालन या व्यवहारातील (खरेदीदार, विक्रेता आणि वीज व्यापारी यासह) सर्व विद्युत कंपन्यां करतील.

२. प्रस्तावित व्यवहारासाठी खरेदीदार आणि विक्रेता यांनी वाणिज्यिक करार केला आहे. दीर्घ-कालिन मुक्त प्रवेश आकार (अदा केले गेले नसल्यास) ते माझ्याकडून भरणा करण्यात येतील.

३. अर्जदार येथे मान्य करतो की, ---------- (पारेषण परवानाधारकाचे नाव) यांना सर्व काळ नुकसान भरपाई देण्याची आणि त्याने मान्यता दिलेल्या व्यवहारांमधून उद्‌भवणारी किंवा परिणामस्वरुप कोणत्याही व्यक्तीला झालेली इजा किंवा मृत्यु किंवा मालमत्तेला झालेले नुकसान, मागण्या, वाद, परिव्यय व खर्चाची वसूली, न्यायालयीन खर्च, वकील फी आणि अन्य पक्षकारांची किंवा त्यांच्याप्रती सर्व दायित्वे यांच्या संबंधातील कोणतेही नुकसान, हानि, दावे आणि कारवाई यापासून त्याला नुकसान भरपाई देण्याची, बचाव आणि रक्षण करण्याची हमी देत आहे.

४. ----------(पारेषण परवानाधारकाचे नाव) यांच्याकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर, आम्ही तीस (३०) दिवसांच्या आत दीर्घ-कालीन मुक्त प्रवेश करार करु व असे न केल्यास, ---------- ----------(पारेषण परवानाधारकाचे नाव) यांना कोणतीही आणखी सूचना न देता मान्यता रद्द करण्याचा हक्क असेल.

५ मे. ---------**----------** (राज्यांतर्गत विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ क्र.--- -------- ने ---------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ चे पालन करेल.

६ मे. ---------**----------** (आंतर-राज्य विजेचा व्यापारी असल्यास त्याचे येथे नाव लिहावे) यांच्याकडे आंतर-राज्य विजेच्या व्यापारासाठी वैध परवाना (संदर्भ

क्र.---------- ने ---------- यांनी दिलेला आणि ------- पर्यंत वैध असलेला) आहे आणि तो वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह केंद्रीय विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठीच्या अटी व शर्ती, कार्यपध्दती आणि अन्य संबंधित बाबी) विनियम, २००९ चे पालन करेल.

अर्जदाराची सही

ठिकाण :

नावः

दिनांक :

पदनामः

अश्वनी कुमार
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांकः ३० मार्च, २०१६.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६		
अनु. क्र.	**अनुक्रमणिका**	**पृष्ठ क्र.**

	भाग ए : प्रारंभिक	१
१.	संक्षिप्त शीर्षक, अर्थनिश्चिती व प्रारंभ	१
२.	व्याख्या	१
३.	मुक्त प्रवेश मागण्यासाठी पात्रता	५
४.	पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता	५
	भाग बी - जोडणीयता	६
५.	जोडणीयता मंजूर करणे	६
६.	जोडणीयतेसाठीच्या अर्जाची छाननी	७
	भाग सी : अर्जाची कार्यपध्दती आणि मंजुरी	१०
७	मुक्त प्रवेशाची वर्गवारी	१०
८.	नोडल एजन्सी आणि मुक्त प्रवेशासाठी अर्ज करण्याची कार्यपध्दती	१०
९.	राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती	१६
१०.	राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेत मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती	१८
११	राज्यांतर्गत पारेषण यंत्रणांमध्ये अल्प-कालिन मुक्त प्रवेशासाठी कार्यपद्धती	१९
१२	राज्य पारेषण कंपनी, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र किंवा वितरण परवानाधारकाची संमती	२३
१३	वाटप करण्यासाठी प्राधान्य	२५
	भाग डी - मुक्त प्रवेशासाठी आकार	२६
१४	पारेषण आकार	२६
१५.	काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग)आणि यंत्रणा संचालन आकार	२७
	भाग इ - काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग),मीटर	
	बसविणे, सुधारणा आणि हानि	२८
१६.	काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग)	२८
१७.	मीटर बसविणे आणि संदेशवहन	२८
१८.	उर्जा हानि	२९
	भाग एफ : असंतुलन आणि रिॲक्टिव ऊर्जा आकार	२९

१९.	असंतुलन आकार	२९
२०.	रिॲक्टीव ऊर्जा आकार	३०
	भाग जी : वाणिज्यिक बाबी	३१
२१.	देयक तयार करणे, वसुली आणि वाटप	३१
२२.	विलंब भरणा अधिभार	३२
२३.	देयक अदा न करणे	३२
२४.	भरणा सुरक्षा पद्धत	३२
२५.	वीज अंतःक्षेपण करण्याच्या आणि वीज खेचण्याच्या ठिकाणात बदल	३३
	भाग एच : माहिती प्रणाली	३३
२६.	माहिती प्रणाली	३३
	भाग आय : संकीर्ण	३५
२७.	राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेतील मुक्त प्रवेशाचा कमी वापर न करणे	३५
२८.	मुक्त प्रवेशासाठी क्षमता उपलब्धतेची परिगणना	३७
२९.	मुक्त प्रवेश कमी करण्यासाठी प्राधान्य	३८
३०.	वाद	३८
३१.	दैवी आपत्ती	३९
३२.	दुरुस्ती करण्याचे अधिकार	३९
३३.	अडचणी दूर करण्याचे अधिकार	३९
३४.	आदेश व कार्यप्रणाली निर्देश	४०
३५.	रद्द करणे आणि अपवाद	४०
परिशिष्ट - १	जोडणीयतेसाठी अर्जाचा नमुना	४१
परिशिष्ट - २	अल्प-कालिन प्रवेशासाठी नमुने	४४
परिशिष्ट - ३	दीर्घ-कालिन/मध्यम-कालिन मुक्त प्रवेशासाठी नमुना अर्ज	५७